दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०५३ • पुणे • मंगळवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

पुरंदर विमानतळापर्यंत जाणार मेट्रो

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात ४४ किलोमीटरचे जाळे; शहरभर विस्तार



मार्गनिश्चितीच्या टप्प्यातील प्रस्ताव

- पिंपरी-निगडी : ४.४१ किमी, ४ स्थानके, ९६०.१८ कोटी; अपेक्षित पूर्णत्व जून २०२७.
- स्वारगेट-कात्रज : ६.०६ किमी, ५ स्थानके, ३,६३७.६४ कोटी; अपेक्षित पूर्णत्व मार्च २०२९.
- पुणे विमानतळ जोडणी - ३ किमी : लोहगाव विमानतळापर्यंत जोडणीसाठी मार्गनिश्चिती सुरू
- जिल्हा न्यायालय-पूलगेट-कोंढवा-येवलेवाडी, कोंढवा-उंड्री शाखेसह -२० किमी : मार्गनिश्चिती सुरू
- वाकड-काञ्रज-शेवाळेवाडी -४५ किमी : सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू
- पुणे-पुरंदर विमानतळ जोडणी - ३० किमी : सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू
- पिंपरी-चिंचवडमधील विद्युत जलद परिवहन प्रणाली (ईआरटीएस) - १८ किमी

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणेमेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात चार मार्गिकांच्या माध्यमातून शहराच्या पूर्व, पश्चिम आणि नैर्ऋत्य भागांपर्यंत मेट्रोचे जाळे विस्तारण्यात येणार आहे. वनाज-चांदणी चौक, रामवाडी-वाघोली/विठ्ठलवाडी, खराडी-खडकवासला आणि नळस्टॉप-वारजे-माणिकबाग या मार्गांचा त्यात समावेश आहे. चार मार्गांची एकूण लांबी ४४.३९ किलोमीटर असून, ४१ स्थानके प्रस्तावित आहेत. पहिल्या टप्प्यातील कार्यरत मार्गांना नव्या मार्गांची जोड मिळाल्यानंतर शहरातील निवासी, व्यापारी आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रांदरम्यान सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय अधिक व्यापक होणार आहे.

महामेट्रोतर्फे सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत महामेट्रोचे संचालक श्रावण हर्डीकर यांनी फेज-१, फेज-२ आणि फेज-३ मधील विस्तारित आराखड्याची माहिती दिली. पश्चिमेकडे वनाजपासून चांदणी चौकापर्यंत आणि पूर्वेकडे रामवाडीपासून वाघोलीतील विठ्ठलवाडीपर्यंत विस्तार करण्यात येणार आहे. वनाज-चांदणी चौक हा लाईन २ ए मार्ग १.१२ किलोमीटरचा असून त्यावर दोन स्थानके असतील. लाईन २ बी हा रामवाडी-विठ्ठलवाडी मार्ग ११.६३ किलोमीटरचा असून त्यावर ११ स्थानके प्रस्तावित आहेत. दोन्ही मार्गांची एकत्रित लांबी १२.७५ किलोमीटर आहे. विस्तारामुळे चांदणी चौकासह विमाननगर, खराडी आणि वाघोली परिसराची विद्यमान मेट्रो जाळ्याशी जोडणी वाढणार आहे.

मेट्रोची लाईन ४ खराडीपासून हडपसर आणि स्वारगेटमार्गे खडकवासल्यापर्यंत जाणार आहे. या २५.५२ किलोमीटरच्या मार्गावर २२ उन्नत स्थानके प्रस्तावित आहेत. त्याला जोडणारी लाईन ४ए नळस्टॉपपासून वारजेमार्गे माणिकबागेपर्यंत असेल. ही शाखा ६.१२ किलोमीटरची असून त्यावर सहा उन्नत स्थानके असतील. या दोन्ही मार्गांची एकत्रित लांबी ३१.६४ किलोमीटर असून अंदाजित खर्च नऊ हजार ८५७ कोटी ८५ लाख रुपये आहे. खराडी, मगरपट्टा, हडपसर, स्वारगेट, नांदेड सिटी आणि वारजे या भागांना त्याचा लाभ अपेक्षित आहे. स्वारगेट, नळस्टॉप आणि खराडी बायपास येथे अन्य मेट्रो मार्गांशी जोडणीचे नियोजन आहे. मेट्रोचे जाळे आणखी वाढवण्यासाठी हडपसर-लोणी काळभोर आणि हडपसर-सासवड रस्ता या मार्गांचे प्रस्तावही आहेत. त्याचप्रमाणे पिंपरी-चिंचवड परिसरात भक्ती शक्ती ते चाकण या मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालावर काम झाले आहे.

पतीसोबतच्या वादातून सहा महिन्यांचा गर्भ पाडण्याची महिलेची मागणी

- सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केले गंभीर प्रश्न!
- पतीचा गर्भपाताला विरोध; 'न जन्मलेल्या बाळावर वडिलांचाही अधिकार आहे', न्यायालयासमोर मांडली भूमिका

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

पतीसोबत सुरू असलेले वैवाहिक मतभेद आणि सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या त्रासाचे कारण पुढे करत सहा महिन्यांचा गर्भपात करण्याची परवानगी मागणाऱ्या महिलेच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. मात्र, या प्रकरणात पतीने गर्भपाताला विरोध करत न जन्मलेल्या बाळावर आपलाही अधिकार असल्याचा दावा केल्याने न्यायालयासमोर पेच निर्माण झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. गर्भपातासाठी महिलेने दिलेले कारण आणि गर्भधारणेच्या सहा महिन्यांनंतर गर्भपाताची मागणी यावर न्यायालयाने गंभीर प्रश्न उपस्थित केले. याचिकाकर्त्या महिलेने पतीसोबतचे संबंध बिघडल्याचे, सासरच्या मंडळींकडून त्रास होत असल्याचे कारण देत गर्भपाताची परवानगी मागितली आहे. तिला हा गर्भ पुढे वाढवायचा नसून पतीपासून घटस्फोटही हवा असल्याचे तिने न्यायालयाला सांगितले. मात्र, पतीने या मागणीला विरोध केला. बाळाच्या जन्मानंतर त्याचा सांभाळ करण्याची पूर्ण जबाबदारी आपण घेण्यास तयार असल्याचे त्याने न्यायालयाला सांगितले. तसेच न जन्मलेल्या बाळाच्या भवितव्याचा विचार करण्याची विनंती केली. न्यायालयाने म्हटले की, हे प्रकरण लैंगिक अत्याचार, बलात्कार किंवा एकल गर्भवती महिलेचे नाही. केवळ पतीसोबतचे भांडण आणि सासरच्या मंडळींकडून होणारा त्रास या कारणांवरून गर्भपाताची मागणी केली जात असेल, तर समाज कोणत्या दिशेने जात आहे, याचा विचार करण्याची गरज आहे. या प्रकरणात वडिलांच्या भूमिकेचाही विचार व्हायला हवा, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

या प्रकरणात गर्भाची वैद्यकीय स्थिती तपासणे महत्त्वाचे असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. गर्भाची वाढ आणि आरोग्य समाधानकारक असल्यास गर्भपाताच्या मागणीचा विचार करताना सर्व संबंधित बाबींचे परीक्षण करावे लागेल, असे न्यायालयाने नमूद केले.



'समाज कोणत्या दिशेने जात आहे?'

सुनावणीदरम्यान खंडपीठाने वैवाहिक वादाच्या कारणावरून गर्भपाताची मागणी करण्याबाबत चिंता व्यक्त केली. पती-पत्नीमध्ये मतभेद होणे ही सामान्य बाब असली, तरी त्याचा आधार घेऊन सहा महिन्यांचा गर्भ संपवण्याची मागणी करणे योग्य आहे का, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला.


नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

सत्यमेव जयते भारत सरकार · महाराष्ट्र शासन · PMRDA · महा मेट्रो PUNE METRO · पुणे मेट्रो


देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

शहरी गतिशीलतेचे प्रगती पर्व




सुमारे ₹ २२,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करून पुण्यातील रहिवाशांचे जीवन अधिक सुलभ करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल

उद्घाटन समारंभ

पुणे मेट्रो मार्गिका-३
माण-हिंजवडी ते शिवाजीनगर

१००% महिला ट्रेन ऑपरेटर्सद्वारे संचालित भारतातील पहिली मेट्रो	थर्ड रेल ट्रॅक्शन प्रणालीवर आधारित जलद आणि सुरक्षित प्रवास	माण- हिंजवडी ते शिवाजीनगर प्रवासवेळेत ५०% पेक्षा अधिक बचत	पीपीपी प्रकल्प: २३ कि.मी. लांबीची मार्गिका आणि २३ उन्नत मेट्रो स्थानके

भूमीपूजन समारंभ

पुणे मेट्रो टप्पा - २

वनाज ते चांदणी चौक	रामवाडी ते विठ्ठलवाडी	खराडी ते खडकवासला	नळ स्टॉप ते माणिकबाग
मार्गिका-२अ	मार्गिका-२ब	मार्गिका-४	मार्गिका-४अ

प्रवासाच्या वेळेत ६०% पर्यंत बचत	विकास आणि संधींचे नवे मार्ग	सुरक्षित, सुलभ आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव	४१ स्थानकांसह ४४ कि.मी.पेक्षा अधिक लांबीचे मेट्रो जाळे

श्री नरेंद्र मोदी
माननीय प्रधानमंत्री
यांच्या शुभहस्ते (दूरदृश्य प्रणालीद्वारे)

दिनांक व वेळ
मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२६,
सकाळी १०:३० वा.

स्थळ
बॅडमिंटन हॉल, श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल,
म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे

विशेष उपस्थिती

श्री जिष्णु देव वर्मा
मा. राज्यपाल

श्री मनोहर लाल
मा. केंद्रीय मंत्री,
गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार तथा ऊर्जा

श्री देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

सन्माननीय उपस्थिती

श्री मुरलीधर मोहोळ
मा. केंद्रीय राज्यमंत्री,
नागरी विमान वाहतूक आणि सहकार

श्री एकनाथ शिंदे
मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), महाराष्ट्र

श्रीमती सुनेत्रा अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ, महाराष्ट्र तथा पालकमंत्री पुणे जिल्हा

श्री चंद्रकांत (दादा) पाटील
मा. उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री

श्री दत्तात्रय भरणे
मा. कृषी मंत्री

श्री अण्णा बनसोडे
मा. महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष

श्रीमती माधुरी मिसाळ
मा. नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री

श्रीमती मंजुषा नागपुरे
पुणे महानगरपालिका महापौर

श्री रवी लांडगे
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका महापौर

श्री वीरधवल जगदाळे
पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष

सर्व माननीय खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी आणि मान्यवर

प्रवासाला पुणेरी मेट्रोचा वेग, PMRDA ची ऐतिहासिक झेप !


देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री · एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री · सुनेत्रा अजित पवार उपमुख्यमंत्री · माधुरी मिसाळ राज्यमंत्री

पाहा डी डी न्यूज चॅनलवर थेट प्रक्षेपण

संपादकाय
विचार आजचा... दिशा उद्याची...

घोषणांचा बोजवारा

शहराचा चेहरामोहरा बदलण्याची स्वप्ने दाखवली गेली. अत्याधुनिक रस्ते, दर्जेदार सार्वजनिक वाहतूक, स्वच्छ परिसर, मुबलक पाणी, सुंदर उद्याने, स्मार्ट पथदिवे आणि जागतिक दर्जाच्या नागरी सुविधा अशा अनेक आश्वासनांची बरसात झाली. स्मार्ट सिटीच्या घोषणांनी नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या. मात्र प्रत्यक्षात आजही सामान्य नागरिकांना वाहतूक कोंडी, खड्डेमय रस्ते, पाणीटंचाई, कचऱ्याचे ढीग, प्रदूषण आणि विस्कळीत नागरी सुविधांशी झुंज द्यावी लागत आहे. मग प्रश्न असा पडतो की, स्मार्ट सिटी नेमकी कोणासाठी उभारली जात आहे?

पुण्यासारख्या वेगाने विस्तारत असलेल्या शहरात विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचे प्रकल्प राबवले जात आहेत. मेट्रो, उड्डाणपूल, रस्ते रुंदीकरण, सुशोभीकरण अशा कामांचा गाजावाजा केला जातो. मात्र या प्रकल्पांचा सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर किती सकारात्मक परिणाम झाला, याचे प्रामाणिक मूल्यमापन होणे गरजेचे आहे. कारण मोठे प्रकल्प म्हणजेच विकास, अशी व्याख्या स्वीकारली तर नागरिकांच्या मूलभूत समस्यांचे काय?

आज शहरातील अनेक रस्त्यांवर वाहतूक कोंडी ही नित्याची बाब झाली आहे. काही ठिकाणी रस्त्यांचे काम सुरू असते, तर दुसरीकडे खोदकाम करून ठेवलेले रस्ते नागरिकांच्या जीवावर उठतात. पावसाळ्यात खड्डे आणि पाणी साचण्याच्या समस्या डोके वर काढतात. पादचाऱ्यांसाठी सुरक्षित पदपथ नाहीत, सायकलस्वारांसाठी पुरेशा सुविधा नाहीत. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना रस्त्यावरून चालतानाही कसरत करावी लागते. अशा परिस्थितीत स्मार्ट सिटीच्या संकल्पनेचा नेमका अर्थ काय?

दुसरीकडे, शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, कचरा प्रक्रिया आणि सार्वजनिक आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांवर अपेक्षित लक्ष दिले जात आहे का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. नवीन इमारती उभ्या राहत आहेत; मात्र त्यांना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांचे नियोजन कुठे आहे? बांधकामांना परवानग्या देताना भविष्यातील लोकसंख्या, पाणी आणि वाहतुकीचा विचार केला जातो का? की आजचा महसूल आणि उद्याची समस्या, एवढ्यापुरतेच नियोजन मर्यादित राहिले आहे?

स्मार्ट सिटी म्हणजे केवळ आकर्षक विद्युत रोषणाई, रंगवलेल्या भिंती, सुशोभित चौक आणि डिजिटल फलक नव्हेत. स्मार्ट सिटी म्हणजे नागरिकांना वेळेवर पाणी मिळणे, रस्त्यांवर सुरक्षितपणे चालता येणे, सार्वजनिक वाहतूक सहज उपलब्ध होणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन होणे आणि प्रशासनाकडून तक्रारींचे वेळेत निराकरण होणे. नागरिकांचे जीवनमान सुधारत नसेल, तर तंत्रज्ञानाचा आणि कोट्यवधींच्या प्रकल्पांचा उपयोग काय?

याहून गंभीर बाब म्हणजे विविध विकासकामांमध्ये समन्वयाचा अभाव. एक विभाग रस्ता तयार करतो, दुसरा विभाग काही दिवसांत तोच रस्ता खोदतो आणि तिसरा विभाग पुन्हा दुरुस्तीचे काम हाती घेतो. या चक्रात सार्वजनिक पैसा खर्च होतो आणि नागरिकांचा वेळ वाया जातो. अशा कामांसाठी जबाबदार कोण, याचा जाब विचारण्याची वेळ आता आली आहे.

प्रशासनाने केवळ प्रकल्प पूर्ण झाल्याचे आकडे मांडण्यापेक्षा त्या प्रकल्पांमुळे नागरिकांना नेमका किती फायदा झाला, हे स्पष्ट केले पाहिजे. प्रत्येक विकासकामाचा खर्च, कालमर्यादा, गुणवत्ता आणि नागरिकांना मिळणारा प्रत्यक्ष लाभ यांची माहिती सार्वजनिक केली पाहिजे. लोकप्रतिनिधींनीही उद्घाटनांच्या कार्यक्रमांपलीकडे जाऊन नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर ठोस भूमिका घेतली पाहिजे.

शहर हे केवळ सरकारचे किंवा प्रशासनाचे नसते; ते नागरिकांचे असते. त्यामुळे विकासाच्या प्रत्येक निर्णयात नागरिकांचा सहभाग आणि त्यांच्या गरजांना प्राधान्य मिळाले पाहिजे. नागरिकांना विश्वासात न घेता राबवलेले प्रकल्प कितीही भव्य असले, तरी त्यांना लोकाभिमुख विकास म्हणता येणार नाही.

आज गरज आहे ती घोषणांच्या स्मार्टपणाची नव्हे, तर कारभाराच्या स्मार्टपणाची! डिजिटल सुविधा असण्यापेक्षा प्रशासनाची कार्यक्षमता महत्त्वाची आहे. भव्य रस्त्यांपेक्षा सुरक्षित रस्ते महत्त्वाचे आहेत. सुशोभीकरणापेक्षा स्वच्छता महत्त्वाची आहे आणि जाहिरातींपेक्षा प्रत्यक्ष काम महत्त्वाचे आहे.

जलकुंभ पालखी सोहळा समितीच्या अध्यक्षपदी तळेकर तर सचिवपदी ॲड. महेंद्र सातकर पाटील

राजगुरुनगर-किरण खुडे
(दै. आरंभ पर्व)



जलकुंभ पालखी सोहळा समितीच्या अध्यक्षपदी जगन्नाथ महाराज तळेकर(बुटेवाडी) व सचिवपदी येथील प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. महेंद्र सातकर पाटील यांची निवड करण्यात आली .

भिमाशंकर ते आळंदी जलकुंभ पालखी सोहळा समितीची कार्तिकी आळंदी वारी नियोजनाची बैठक येथील प्राचिन सिध्देश्वर मंदिरात आयोजीत करण्यात आली होती. यावेळी नवनिर्वाचीत अध्यक्ष, सचिव व कार्यकारीणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. बैठकीच्या सुरुवातीला ज्ञात अज्ञात दिवंगत देशवासीयांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच या बैठकीमध्ये शासनाच्या कार्तिकी वारीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व सर्व शासकीय नियम पाळून जाण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच शिवबाबा चॅरिटेबल ट्रस्ट,वाल्मीक ऋषी जीर्णोध्दार ट्रस्ट बाबत तसेच आश्रमाच्या जिर्णोद्धारासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारीणीसह इतर विविध कमेट्यांच्या सदस्यपदी चाळीस जणांची निवड करण्यात आली. याप्रसंगी ह. भ. प. विठ्ठल महाराज गुंडाळ, (गुंडाळवाडी), ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज पावडे(वाडा), ह.भ.प जयहरि महाराज डांगले(पाईट), बोरकर महाराज(सायगाव), विठ्ठल महाराज सातकर (पाडळी), आण्णा महाराज शिंदे(कडूस), मनोहर महाराज वाडेकर(वाडा), भिमाशंकर कोकणे, गणेश मुळुक, राजेंद्र घनवट, निवृत्ती नेहरे, पोपट रौंधळ, रमेश रहाणे, ज्ञानेश्वर ढोरे, भागचंद आरुडे, कैलास महाराज मांजरे, दत्तात्रय गोगावले अनिल महाराज लांडगे (कडुस), सुभाष गाडेकर, बाळासाहेब तळेकर, रंगनाथ तळेकर, निवृत्ती सातकर, बाळासाहेब कोहीनकर, नाना पवळे, ज्ञानेश्वर तळेकर,बबन पोळ, पुंडलिक तळेकर, किसन तळेकर, माणिक खेंगले, गुलाब बोऱ्हाडे, पांडुरंग कातळे, दशरथ घोलप, दादाभाऊ गाढवे, प्रभाकर ढोरे, अर्जुन भांबुरे, मारुती टाकळकर, नारायण गेंगजे व इतर वारकरी भाविक उपस्थित होते.

२४ कॅरेट डिजिटल गोल्डवरील कॅशबॅक ऑफरचा लाभ घेत साजरी करा धनत्रयोदशी

पुणे (दै. आरंभ पर्व)

फोनपेने धनत्रयोदशीनिमित्त 24 कॅरेट डिजिटल गोल्डच्या खरेदीवर आकर्षक कॅशबॅक ऑफर जाहीर केली आहे. फोनपेवरून किमान 2000 रुपयांचे डिजिटल गोल्ड खरेदी केल्यास युजरना थेट 2% कॅशबॅक (कमाल रु.2000) मिळू शकते. ही ऑफर 6 नोव्हेंबर 2026 रोजी केवळ एकरकमी व्यवहारांसाठी लागू असेल. (प्रत्येक युजरला या ऑफरचा एकदाच लाभ घेता येईल. एसआयपी व्यवहारांसाठी ही ऑफर लागू नाही.) ग्राहक किमान रु.2000 किमतीचे 24 कॅरेट डिजिटल गोल्ड खरेदी करून या ऑफरचा लाभ घेऊ शकतात. डिजिटल पद्धतीने खरेदी केलेल्या प्रमाणित 24 कॅरेट सोन्यावर कोणतेही मेकिंग चार्जेस आकारण्यात येत नाहीत. तसेच बँकेच्या दर्जाची सुरक्षा असलेल्या लॉकरमध्ये हे सोने मोफत ठेवण्यात येते. ग्राहकांना हे सोने कधीही विकता येते.

थोडक्यात पण महत्वाचे



ॲक्सिस मॅक्स लाईफची टाटा फिनटेकसोबत भागीदारी

पुणे (आरंभ पर्व) : ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेड ने भारतातील वैविध्यपूर्ण लॉयल्टी आणि वित्तीय सेवा ॲप असलेल्या टाटा न्यूवर जीवन विमा उपाययोजनांचा विस्तार करण्यासाठी टाटा डिजिटलची उपकंपनी असलेल्या टाटा फिनटेकसोबत भागीदारी केली आहे. या भागीदारीमुळे ग्राहक या प्लॅटफॉर्मवर ॲक्सिस मॅक्स लाईफचे निवडक संरक्षण आणि दीर्घकालीन बचत उपाययोजना शोधू आणि खरेदी करू शकतील. ॲक्सिस मॅक्स लाईफच्या जीवन विमा क्षेत्रातील कौशल्ये टाटा डिजिटलच्या कनेक्टेड डिजिटल इकोसिस्टमसोबत जोडली गेल्यामुळे ग्राहकांना त्यांच्या महत्त्वाच्या आर्थिक प्राधान्यक्रमांवर काम करणे सोपे होईल. हे सहकार्य जीवन विम्याला अशा प्लॅटफॉर्मवर आणण्यासाठी तयार केले आहे, ज्याचा वापर ग्राहक विविध आर्थिक आणि जीवनशैलीच्या गरजांसाठी करतात. आर्थिक हेतू आणि कृती यांमधील अंतर कमी करून संरक्षण आणि दीर्घकालीन नियोजन अधिक सुलभ, समर्पक आणि सोयीस्कर बनवण्याचे ॲक्सिस मॅक्स लाईफ आणि टाटा डिजिटलचे उद्दिष्ट आहे. ॲक्सिस मॅक्स लाईफचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित मदन म्हणाले, ॲक्सिस मॅक्स लाईफचे संरक्षण आणि दीर्घकालीन बचतीचे उपाय टाटा न्यूवर आणून लोक आणि कुटुंबांना माहितीपूर्ण आर्थिक निर्णय घेण्यासाठी आणि भविष्यासाठी अधिक आत्मविश्वासाने नियोजन करण्यासाठी सक्षम करणे, हे आमचे ध्येय आहे. ही भागीदारी डिजिटल माध्यमातून विम्याचा विस्तार करण्याच्या आमच्या दृष्टिकोनाला पुढे नेते आणि अधिक भारतीयांना दीर्घकालीन आर्थिक सुरक्षेसाठी एक मजबूत पाया तयार करण्यास मदत करते."

ह. भ. प. कबीर महाराज अत्तार यांच्या प्रवचनाचे आयोजन

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : उरुळी कांचन येथील कै.कांतीलाल चंद्रकांत काळे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध राष्ट्रीय शिवशंभू व्याख्याते ह.भ.प.कबीर महाराज अत्तार यांच्या विशेष प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत पुणे-सोलापूर महामार्गावरील कलावती लॉन्स येथे हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. प्रथम पुण्यस्मरणाच्या निमित्ताने आयोजित या प्रवचनातून अध्यात्म, संस्कार, शिवचरित्र आणि विचारांचा अनमोल ठेवा उपस्थितांना अनुभवता येणार आहे. कै.कांतीलाल काळे यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याबरोबरच त्यांच्या स्मरणार्थ आयोजित या वैचारिक व आध्यात्मिक कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि शिवशंभूप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

तळेगावच्या विकासकामांना गती द्या

राष्ट्रवादी-भाजपच्या शिष्टमंडळाची प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे मागणी

तळेगाव दाभाडे (दै. आरंभ पर्व)



शहरातील रस्ते, समाजमंदिरांचे बांधकाम व नूतनीकरण, भूमिगत विद्युतीकरण, उद्यानांचा विकास आणि पाणीपुरवठा यंत्रणेच्या सक्षमीकरणासह विविध प्रलंबित विकासकामे मार्गी लावावीत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपच्या शिष्टमंडळाने भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

यावेळी आमदार सुनील शेळके, नगराध्यक्ष संतोष दाभाडे पाटील, भाजपचे रवींद्र भेगडे, नगरसेवक निखिल भगत आणि चिराग खांडगे उपस्थित होते.

निवेदनात मनोहरनगर येथील म्हाडा सोसायटीमध्ये समाजमंदिर बांधणे, राधानगरी परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे, स्वराजनगरीतील विविध मोकळ्या जागांना संरक्षक भिंत बांधणे, नाना-नानी पार्क ते भास्कर भेगडे यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे, राव कॉलनीतील समाजमंदिराचे नूतनीकरण करणे, अशा कामांचा समावेश आहे. तसेच शाळा चौक ते राजेंद्र चौक आणि दाभाडे आळी ते साने आळी परिसरात भूमिगत विद्युतीकरण करणे, प्रभाग क्रमांक एकमधील अंतर्गत रस्ते विकसित करणे, बेथेल सोसायटीतील अंतर्गत रस्त्यांची कामे करणे, राजगुरू कॉलनीतील उद्यान विकसित करणे आणि ज्ञानेश्वरनगरमधील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय प्रभाग क्रमांक आठमधील अंतर्गत रस्त्यांची कामे, वुडलँडमधील मोठी मोकळी जागा विकसित करणे, सोमाटणे येथे नवीन जॅकवेल व ॲप्रोच ब्रिज बांधणे, तसेच चौराई जलशुद्धीकरण केंद्रात नवीन पंपवेल बांधण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

शहरातील नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, रस्त्यांच्या समस्या सोडविणे, सार्वजनिक जागांचा विकास करणे आणि पाणीपुरवठा यंत्रणा अधिक सक्षम करणे या दृष्टीने ही कामे महत्त्वाची आहेत. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रलंबित कामांना गती देऊन संबंधित विकासकामे लवकरात लवकर मार्गी लावावीत, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

नशामुक्त समाजासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज



पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे आणि महाराष्ट्राला नशामुक्त करण्यासाठी युनायटेड मायनॉरिटी कौन्सिलने (युएमसी) हाती घेतलेल्या उपक्रमाचे कौतुक करताना पंजाबचे शाही इमाम मौलाना मोहम्मद उस्मान रहमानी लुधियानवी म्हणाले की, नशामुक्त समाज घडवण्यासाठी कुटुंब, धार्मिक संस्था आणि समाजातील सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. उपस्थितांना मार्गदर्शन करताना मौलाना रहमानी म्हणाले की, व्यसनाधीनतेचा परिणाम केवळ संबंधित व्यक्तीच्या आरोग्यावर आणि भविष्यावर होत नाही, तर त्याचे संपूर्ण कुटुंबही त्याचे दुष्परिणाम भोगते. त्यामुळे व्यसनाधीन व्यक्तींना समाजापासून दूर लोटण्याऐवजी त्यांना योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. नशा-मुक्तिसाठी समाजात जनजागृती करण्याबरोबरच गरजू व्यक्तींसाठी उपचार आणि पुनर्वसनाची व्यवस्थाही उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

स्तनाच्या कर्करोगाचे लवकर निदान महत्त्वाचे

पुणे (दै. आरंभ पर्व)

स्तनाचा कर्करोग हा आजार हजारो वर्षांपासून ज्ञात असला, तरी वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे त्याच्या उपचारांमध्ये मोठे बदल झाले आहेत. आधुनिक शस्त्रक्रिया, हार्मोन थेरपी आणि लक्ष्यित औषधोपचारांमुळे रुग्णांना उपचारांचे अधिक चांगले पर्याय उपलब्ध झाले आहेत. मात्र, या आजाराचे वेळीच निदान होणे अद्यापही महत्त्वाचे आहे. भारतात महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग सर्वाधिक आढळतो. २०२४ मधील अंदाजानुसार, देशात सुमारे २.३७ लाख महिलांना या आजाराचे निदान झाले असून, महिलांमधील एकूण नवीन कर्करोगाच्या रुग्णांपैकी ३०.४ टक्के रुग्ण स्तनाच्या कर्करोगाचे होते. चिंतेची बाब म्हणजे, जवळपास ६० टक्के रुग्णांमध्ये आजाराचे निदान तिसऱ्या किंवा चौथ्या टप्प्यात होते. इंडियन कॅन्सर सोसायटीच्या २०२४-२५ च्या वार्षिक अहवालानुसार, मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद येथील कर्करोग नोंदणीमध्ये स्तनाचा कर्करोग आघाडीवर असून, नोंदवलेल्या प्रकरणांमध्ये त्याचे प्रमाण १७.४ टक्के आहे.

२०२७ पासून सर्व स्मार्टफोनमध्ये बदलता येणारी बॅटरी अनिवार्य करा

पुणे (दै. आरंभ पर्व)



स्मार्टफोनची बॅटरी खराब झाल्यानंतर संपूर्ण मोबाइल बदलण्याची वेळ ग्राहकांवर येऊ नये, यासाठी २०२७ पासून भारतात उत्पादित आणि विक्री होणाऱ्या सर्व स्मार्टफोनमध्ये सहज काढता व बदलता येणारी बॅटरी अनिवार्य करण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी अग्रवाल मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एज्युकेशन (AMCCIE) यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. यासंदर्भात AMCCIE चे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे स्वतंत्र राष्ट्रीय धोरण तयार करण्याची मागणी केली आहे. सध्या बहुतांश आधुनिक स्मार्टफोनमध्ये बॅटरी बदलण्यासाठी विशेष तांत्रिक प्रक्रिया आणि अधिकृत सर्व्हिस सेंटरची मदत घ्यावी लागते. यासाठी ग्राहकांना मोठा खर्च करावा लागतो. अनेकदा केवळ बॅटरी खराब झाल्यामुळे ग्राहकांना नवीन मोबाइल खरेदी करण्याचा पर्याय स्वीकारावा लागतो. परिणामी ग्राहकांचा आर्थिक भार वाढण्याबरोबरच इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची समस्याही अधिक गंभीर होत आहे. याबाबत भूमिका स्पष्ट करताना राजेश अग्रवाल म्हणाले, "तंत्रज्ञानाचा खरा उद्देश सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ करणे हा असला पाहिजे; अनावश्यक खर्च वाढवणे नव्हे. स्मार्टफोनची केवळ बॅटरी खराब झाली असेल, तर संपूर्ण मोबाइल बदलण्याची वेळ ग्राहकांवर का यावी? बॅटरी बदला, संपूर्ण मोबाइल नाही!" या धोरणामुळे कोट्यवधी मोबाइल ग्राहकांचे पैसे वाचण्यासोबतच स्मार्टफोनचे आयुष्य वाढेल आणि ई-कचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास AMCCIE ने व्यक्त केला आहे. याशिवाय मोबाइल रिपेअरिंग सेंटर्स, बॅटरी उत्पादन, स्पेअर पार्ट्स, रिफर्बिशमेंट आणि पुनर्चक्रण (रीसायकलिंग) क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते. परिणामी MSME उद्योग, लघुउद्योजक, तंत्रज्ञ आणि तरुणांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, ग्राहक व्यवहार मंत्रालय तसेच पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय यांनी संयुक्तपणे व्यापक राष्ट्रीय धोरण तयार करावे, असेही AMCCIE ने सुचविले आहे.

'बीएनसीए'च्या डॉ. वैशाली लाटकर आंतरराष्ट्रीय वारसा मार्गदर्शनासाठी मलेशियात

इंटरनॅशनल कौन्सिल ऑन मॉन्यूमेंट्स अँड साईट्सच्या कार्यशाळेत सहभागी

पुणे (दै. आरंभ पर्व)



महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेन मधील (बीएनसीए) संस्कृती अध्यायन केंद्राच्या प्रमूख आणि आंतरराष्ट्रीय वारसा प्रशिक्षणाच्या उपाध्यक्ष डॉ. वैशाली लाटकर या नुकत्याच मलेशियातील कुचिंग येथे भरवण्यात आलेल्या इंटरनॅशनल कौन्सिल ऑन मॉन्यूमेंट्स अँड साईट्सच्या (आयकोमॉस) २२व्या सर्वसाधारण सभेत, कार्यशाळेत आणि परिसंवादात सहभागी झाल्या. संपूर्ण जगभरात ऐतिहासिक वारसा स्थळांच्या जतन-संवर्धन विषयीचे संशोधनाबाबत डॉ. लाटकर व त्यांच्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञ सहकार्यांनी मिळून एक शोधनिबंध सादर केला.

डॉ. लाटकर यांची सीआयएफए (आयकोमॉस इंटरनॅशनल ट्रेनिंग कमिटी) ह्या वारसा संरक्षण प्रशिक्षण संबंधित आंतरराष्ट्रीय समितीवर पश्चिम आणि दक्षिण आशियाच्या उपाध्यक्षा म्हणून फेरनिवड झाली. तसेच ह्या परिषदेमध्ये स्थानिक लोकसंस्थांच्या अधिकाऱ्यांसाठी असलेल्या प्रशिक्षण शिबिरात त्या प्रशिक्षक म्हणूनही त्या सहभागी झाल्या. याबद्दल बीएनसीएच्या प्रभारी प्राचार्य डॉ. शुभदा कमलापूरकर यांनी डॉ. लाटकर यांचे अभिनंदन केले.

या भेटीसंबधी माहिती सांगताना डॉ. लाटकर म्हणाल्या की, आशिया खंडातील हे आयोजन असून त्यामध्ये ऐतिहासिक वास्तू व स्मारके आणि सांस्कृतिक वारसा जतन करणाऱ्या जागतिक पातळीवर काम करणाऱ्या आयकोमॉस संस्थेची सर्वसाधारण सभा आशिया खंडात भरवण्यात आली. त्यामध्ये वैज्ञानिक परिसंवादात सहभागी होण्यासाठी जगभरातून पूरातत्त्वशास्त्रज्ञ, वारसा स्थळ संरक्षण तज्ज्ञ, वास्तूरचनाशास्त्र (आर्किटेक्चर) अभ्यासक आणि सुमारे १५०० संशोधक सहभागी झाले. त्यांनी सांस्कृतिक वारसा संवर्धन, शाश्वत विकास आणि जुन्या वास्तूंच्या रक्षणासंदर्भात विस्तृत चर्चा केली. या निमित्त विविध चर्चासत्रे आणि सहलींच्या आयोजनात विविध आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक समित्यांच्या बैठका, तज्ज्ञांची भाषणे यांच्या जोडीला स्थानिक ऐतिहासिक वारसा स्थळांच्या भेटी आणि जतन-संवर्धन कार्यशाळांचेही आयोजन केले.

ह्या संशोधन विषयातून निष्पन्न झालेल्या महत्वाचे मुद्दे जगभरातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाची दिशा ठरवण्यासाठी उपयुक्त ठरतील. त्यातून वेगवेगळ्या देशांमधील ऐतिहासिक वारसा शिक्षण तज्ज्ञांमध्ये समन्वय साधण्यासाठीही ते उपयोगी ठरतील. या निमित्त करण्यात येत असलेल्या संशोधनावर व परिषदेतील चर्चिल्या गेलेल्या विषयांवर दस्तावेज म्हणून पुस्तकही लवकरच प्रकाशित करण्यात येत असल्याचे डॉ लाटकर यांनी सांगितले.

जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, अशिल राजेंद्र दिगंबर कामठे रा. मु. पो. फुरसुंगी, रेल्वेगेटजवळ, ता. हवेली, जि. पुणे ४१२३०८ यांनी गाव मौजे कदमवाकवस्ती येथील गावठाणातील निवासी मिळकती मधील क्षेत्र ०० हे. ०१ आर यावर बांधलेले आर सी सी इमारत पश्चिममुखी पु. प. ३४.६ बाय दक्षिणोत्तर २१.३ म्हणजेच ७३३ चौ. फुट म्हणजेच ६८.१३ चौ. मी. शौचालयासह यांसी ग्रामपंचायत मिळकत क. ३१७ जुना १६२३ ही मिळकत आमचे अशिलांनी खरेदी घेतेलेली असून सदर मिळकतीचे खरेदीखत दस्त स. दु. नि. हवेली क. ०६ यांच्या कार्यालयात दस्त क. ४०४७/२००९, ३४६/२००१, ६७३६/२००५, ११४४/२००५, ५७९/२००५, ५०६१/२००८ अन्वये नोंदविण्यात आले होते. सदर दस्तांच्या मुळ प्रती व सुची क. २ आमचे अशिल राजेंद्र दिगंबर कामठे यांच्याकडून गहाळ झालेले आहेत. तरी सदर मुळ दस्त प्रति व सुची क. २ कोणास सापडल्यास त्यांनी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा मो. नंबर ७८८७४१०९०२.

सही
ॲड. विशाल कैलास बढेकर
9860654418
कदमवाकवस्ती ता. हवेली, जि. पुणे

पुणे
दिनांक : ३०/१०/२०२६

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२६
३



झ्रेनेज लाईनचे कोट्यवधी रुपये पाण्यात

- वाड्यावर त्यावरील सांडपाणी रस्त्यावर
- लोहगावकरांना विकासकामांची प्रतिक्षा अजून किती वर्ष
- पालिकेत समावेश करून उपयोग काय?

पुणे - निरंजन (सोमनाथ) साळुंके (दै. आरंभ पर्व)

महापालिकेत समावेश होऊन नऊ वर्षे दोन महिन्याचा कालावधी उलटून देखील कोट्यवधी रुपये ड्रेनेज लाईनसाठी मंजूर करण्यात आलेल्या लोहगाव परिसरातील अद्याप ही संबंधित कामे अर्धवट अवस्थेत आल्यामुळे या कामासाठी मंजूर करण्यात आलेले कोट्यवधी रुपयांचा निधी पाण्यात गेला असल्याचे म्हणण्याची वेळ नागरिकांवर येऊन राजकीय नेते व पालिका प्रशासनाच्या विरोधात नागरिकांमध्ये नाराजीचे सूर उमटले आहे.

स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरातील लोहगाव भागात दिवसेदिवस वाढती लोकसंख्या व वाढलेला विस्तार लक्षात घेऊन पालिका प्रशासनाच्या वतीने अंदाजे आठ ते नऊ वर्षांपूर्वी परिसराचा पालिकेत समावेश झाल्यानंतर ग्रामपंचायतीच्या काळात रखडलेल्या विकासकामांना भविष्यात प्राधान्य मिळेल या आशेने अनेकांच्या चेहऱ्यावर उत्साहाचे वातावरण दिसून येऊन अनेकांमध्ये आनंद


गुगल छायाचित्र

साजरा करण्यात येत होता. मात्र पालिकेच्या दुर्लक्षित कारभारामुळे हा परिसर विविध समस्यांच्या विळख्यात अडकून स्थानिक नागरिकांची अजून ही यामधून सुटका न झाल्याने त्यांना विविध कामांच्या अडचणींचा पाढा वाचण्याची वेळ येत आहे. सध्या असलेले गाव हे जवळपास बारा ते तेरा वाड्या वस्त्या मिळून बनले असल्याने ज्या कार्यकाळात सर्व गावचा कारभार ग्रामपंचायत मार्फत चालविला जात असताना येथील इतर समस्येबरोबर गावातील पावसाळी व सांडपाणी वाहून जाण्यासाठी अंदाजे दहा ते बारा वर्षापूर्वी ग्रामपंचायत मार्फत गावात ड्रेनेज लाईन टाकल्यामुळे गावकऱ्यांनी त्या वेळेस मोकळा श्वास सोडला होता. मात्र कालांतराने गावचा पालिकेत समावेश झाल्यानंतर वाड्या वस्त्यावरील ड्रेनेज लाईनचे असलेले काम रखडल्यामुळे स्थानिक नागरिकांना आज ना उद्या सदरचे काम मार्गी लागेल या आशेत वाड्या वस्त्यावरील नागरिक राहिले.

विशेष करून संपूर्ण गावातील संबंधित काम पूर्ण होण्याच्या उद्देशाने स्थायी समितीच्या वतीने कोट्यवधी रुपयांचा निधी सदरच्या कामास मंजूर करण्यात आला होता. मात्र सदरच्या कामास आठ ते नऊ वर्षांचा कालावधी उलटून देखील ते अर्धवट अवस्थेत राहिल्यामुळे पालिका प्रशासन अधिकाऱ्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर येऊन आजच्या परिस्थितीत येथील स्थानिक महिलांना घरातील सांडपाणी वाहून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची जागा उपलब्ध नसल्याने नाईलाजास्तव अनेक महिलांना उघड्यावरच सांडपाणी टाकण्याची वेळ येऊन अनेक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनून आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यामुळे डेंग्यू, मलेरिया यासारख्या महाभयंकर आजाराची साथ पसरते की, काय? याची धास्ती नागरिकांच्या मनात राहून सध्या पूर्व हवेली भागात डेंग्यू, मलेरिया यासारख्या आजारांनी थैमान घातल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

यासह गावातील अनेक वाड्या वस्त्याकडे जाणाऱ्या मार्गांची वाट लागून खेळखंडोबा झाल्यामुळे पडणाऱ्या पावसामुळे अनेक रस्ते हे जलमय होऊन अनेक रस्त्यांना तळ्याचे स्वरूप प्राप्त होत आहे. त्यामुळे रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे व साचलेल्या पाण्यामुळे रस्ते खड्ड्यात की, खड्डे रस्त्यात हा संभ्रम अनेकांना पडत आहे. त्यामुळे वाढलेल्या खड्ड्यांमुळे व साचलेल्या पाण्यामुळे अनेक वाहनचालकांना कसरत करूनच वाहन चालविण्याची वेळ येऊन अनेकदा छोट्या मोठ्या घडणाऱ्या अपघातांना जबाबदार कोण ? असा संतप्त सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात असतानाच या भागाचा ज्यावेळेस पालिकेत समावेश करण्यात आला त्यावेळेस एखाद्या सर्वसामान्य नागरिकास कर भरण्यास विलंब झाल्यावर अशा नागरिकांवर पालिका प्रशासनाने कोणत्याही प्रकारचा विचार न करता घरावर नांगर फिरविण्याचे काम केले असता सध्या हा भागातील नागरिकांना जर नेहमीच येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्याची वेळ येत असेल तर परिसराचा पालिकेत समावेश करून उपयोग काय? असा सवाल उपस्थित होऊन विधानसभा व पालिका निवडणूक काळात अनेक पक्षातील इच्छुक उमेदवारांनी स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी भविष्यात विकासकामे करण्याचा दावा केला होता.

मात्र दोन्ही झालेल्या निवडणुकांना दोन वर्षाचा व दहा महिन्याचा कालावधी उलटून गेला असताना ज्या इच्छुक उमेदवारांसह स्थानिक नेत्यांना दिलेल्या आश्वासनांचा विसर पडून आता हेच नेते मंडळी प्रभागातून गायब झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांनी दिलेली आश्वासने ही हवेत विरली असून फुसका बार ठरल्याची चर्चा सर्वसामान्य जनतेमध्ये रंगली आहे. त्यामुळे भविष्य काळात तरी रखडलेल्या विकासकामांना चालना मिळणार का? या संभ्रमात स्थानिक नागरिक असून ती पूर्ण होणार की, नाही याचे उत्तर सध्या तरी अनुत्तरीत असल्याचे ड्रेनेजचे न झालेल्या कामामुळे स्पष्ट होत आहे. तरी ड्रेनेज लाईनची रखडलेली कामे पूर्ण लवकर पूर्ण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

लोहगाव प्रभागाचा प्रामुख्याने पालिकेच्या नगररोड क्षेत्रीय कार्यालयात होत असल्याने याची अधिक माहिती घेण्यासाठी दैनिक आरंभ पर्वचे प्रतिनिधी क्षेत्रीय कार्यालयात गेले असता कार्यालयाचे सहायक आयुक्त यांची माहिती समोर येऊन कार्यालयातील अनेक अधिकाऱ्यांच्या खुर्च्या रिकाम्या दिसून आल्याने येथील कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत शंका उपस्थित होऊन कोणता कनिष्ठ अधिकारी ड्रेनेज लाईनचे काम पाहत आहे. याची पुसटशी कल्पना कोणास नसल्याने अशा अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत शंका उपस्थित केली जात आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



सर्वांगीण आरोग्यसेवेवर भर देणाऱ्या चेलाराम वुमन्स हेल्थ सेंटरचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : चेलाराम फाउंडेशनच्या वतीने पुण्यातील बावधन येथे 'चे चेलाराम वुमन्स हेल्थ सेंटर 'चे (सीडब्ल्यूएचसी) उद्घाटन करण्यात आले. महिलांच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर त्यांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन सर्वांगीण आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. चेलाराम हॉस्पिटल डायबेटिस केअर अँड मल्टिस्पेशालिटीच्या जवळ असलेल्या या केंद्रात किशोरवयीन मुलींचे आरोग्य, प्रजनन आरोग्य, रजोनिवृत्तीच्या काळातील आरोग्य व्यवस्थापन, आहार व पोषणविषयक मार्गदर्शन, जीवनशैलीशी संबंधित आजारांचे प्रतिबंध व व्यवस्थापन, कर्करोग तपासणी, हाडांच्या आरोग्याची तपासणी तसेच प्रौढांसाठी लसीकरण अशा विविध सेवा उपलब्ध आहेत. या केंद्राचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त), माजी कुलगुरू, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. यावेळी सन्माननीय अतिथी म्हणून कर्नल प्रा. (डॉ.) हेमलता के. बागला, कुलगुरू, एचएसएनसी विद्यापीठ आणि एसएनडीटी महिला विद्यापीठ उपस्थित होत्या. तसेच ज्येष्ठ समाजसेविका लीला पूनावाला, चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ए. जी. उन्नीकृष्णन, संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विंग कमांडर (डॉ.) हर्षल मोरे (निवृत्त), ,चेलाराम हॉस्पिटल डायबेटिस केअर अँड मल्टीस्पेशालिटीच्या वैद्यकीय सेवा प्रमुख डॉ. वेदवती पुरंदरे, चेलाराम वुमन्स हेल्थ सेंटरच्या प्रमुख आणि महिला आरोग्य सल्लागार डॉ. मंजुषा घुमरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कर्मचाऱ्यांना प्रथमच मिळणार बोनस!

पुणे (आरंभ पर्व) : भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयातील कायमस्वरूपी (परमनंट) अधिकारी व कर्मचाऱ्यांना यंदा प्रथमच बोनस मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी कार्याची दखल घेत त्यांनाही बोनसचा लाभ मिळावा, यासाठी महापौर मंजुषा नागपुरे यांनी सकारात्मक पुढाकार घेतला आहे. महाविद्यालयातील कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना बोनस देण्यासंदर्भातील प्रस्ताव तातडीने तयार करून आवश्यक मान्यतेसाठी सादर करावा, असे स्पष्ट निर्देश महापौर मंजुषा नागपुरे यांनी संबंधित प्रशासनाला दिले आहेत. कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा सन्मान आणि त्यांच्या हक्काच्या लाभासाठी महापौर मंजुषा नागपुरे यांनी घेतलेला हा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

धायरीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग गायकवाड यांचे निधन



धायरी (आरंभ पर्व) : धायरी गावातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि प्रसिद्ध दामिनी हॉटेलचे मालक पांडुरंग धोंडिबा गायकवाड (वय ८६) यांचे रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने धायरी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पांडुरंग गायकवाड हे धायरी गावातील परिचित व्यक्तिमत्त्व होते. दामिनी हॉटेलच्या माध्यमातून त्यांची परिसरात विशेष ओळख निर्माण झाली होती. सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांनी शोक व्यक्त केला. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, दोन भाऊ, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. शिवसेनेचे विभागप्रमुख सुरेश गायकवाड यांचे ते बंधू होत. त्यांच्या निधनाने गायकवाड कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, धायरी परिसरातून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाअभावी नऊ लाख ६२ हजार हेक्टर क्षेत्र बाधीत

अहिल्यानगर (आरंभ पर्व) : अहिल्यानगर जिल्ह्यात यंदा पावसाअभावी खरिपातील सुमारे नऊ लाख ६२ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. १२ लाख १५ हजार ६६९ शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला असून, यातील बहुतांश क्षेत्रावरील नुकसान ३३ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना मदत मिळावी, यासाठी १३६५ कोटी १४ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आला आहे.

काव्यारंभ

कष्टाची दिवाळी

गरीब कष्टकरी मजुरांच्या दारी
आनंदाची व्हावी दिवाळी साजरी
दिवा पणती आकाशकंदीलांनी
उजळून जावी झोपडी अंधारी

लाडू करंजी चकलीचा फराळ
दिवाळीची प्रीत वाटे न्यारी
हौसमौज पुरती व्हावी लेकरांची
दुःखाची छटा विरुन जावी सारी

कर्ज उसनवार महागाईची झळ
सोसून करावी दिवाळीची तयारी
मनातील मळभ जुळून जाता सारे
मग गोड लागे कष्टाची भाकरी

ना कुणी इथे उपाशी राहावा
समृद्धीची नवी पहाट यावी दारी
श्रमालाही प्रतिष्ठा सन्मान मिळावा
मग अशी दिवाळी दुनियेत भारी

कष्ट परिश्रमाने फुलवून ज्योत
दुःख सरता सुख येई घरी
तिमिराकडून तेजाकडे जाता
ज्ञानदीप लावू आपुल्या अंतरी

- विठ्ठल वळसे पाटील,
पुणे - 8484066042

विवाहितेचा संशयास्पद मृत्यू; १० तोळे सोन्याची मागणी केल्याचा आरोप

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुण्यातील मुकुंदनगर परिसरात ३४ वर्षीय विवाहितेचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. पायल झांबरे-पाटील हिचा सोमवारी एका फ्लॅटमध्ये मृतदेह आढळला. सासरच्या मंडळींकडून सोन्याच्या मागणीसाठी मानसिक छळ केला जात असल्याचा आरोप त्यांच्या माहेरच्या नातेवाइकांनी केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी पती अक्षय झांबरे-पाटील याला अटक केली आहे. पायल हिचे लग्न अक्षय झांबरे-पाटील याच्याशी झाले होते. या दाम्पत्याला एक मुलगी आहे. पायल यांनी यापूर्वी आयटी क्षेत्रात नोकरी केली होती. मात्र, नंतर त्यांनी नोकरी सोडली होती. पायलच्या नातेवाइकांनी केलेल्या आरोपानुसार, लग्नापासूनच सासरच्या मंडळींकडून तिचा मानसिक छळ केला जात होता. दरवर्षी दिवाळीच्या काळात १० तोळे सोन्याची मागणी केली जात होती. यंदाही सोन्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे एवढे सोने देणे शक्य नसल्याचे माहेरच्या मंडळींनी सांगितले होते. पुढील वर्षी सोने देण्याचे आश्वासनही दिले होते. पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, २०२२ मध्ये पायल गर्भवती असताना पती आणि सासरच्या मंडळींकडून मुलगाच व्हावा यासाठी दबाव टाकण्यात आला होता. ३० मार्च २०२३ रोजी तिने मुलीला जन्म दिल्यानंतर सासरच्या मंडळींनी रुग्णालयात जाऊन वाद घातल्याचा आरोप आहे. तसेच, पायल आणि मुलीची जबाबदारी घेणार नसल्याचेही त्यांना सांगण्यात आल्याचे तक्रारीत सांगण्यात आलेले आहे.

निरपेक्ष भावनेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची समाजाला गरज

हेमंतराव हरहरे

तळेगाव दाभाडे (दै. आरंभ पर्व)

समाजासाठी निरपेक्ष भावनेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची समाजाला गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकारी सदस्य हेमंतराव हरहरे यांनी केले. तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील थोर समाजसेवक नथुभाऊ भेगडे पाटील यांच्या नावाने नामकरण करण्यात आलेल्या सभागृहाच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष संतोष दाभाडे पाटील होते. यावेळी माजी मंत्री संजय बाळा भेगडे,आमदार सुनील शेळके,मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष गणेश खांडगे,



मावळ तालुका भाजपचे माजी अध्यक्ष रवींद्र भेगडे, प्रदेश किसान मोर्चाचे माजी अध्यक्ष गणेश भेगडे, उपनगराध्यक्ष गणेश काकडे, माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी, सुरेश धोत्रे, श्रीमंत सत्यशीलराजे दाभाडे, माजी नगरसेविका वैशाली भेगडे, पंचायत समितीचे माजी सभापती एकनाथर टिळे,भाजपचे शहराध्यक्ष विनायक भेगडे, मुख्याधिकारी गिरीश दापकेकर, संतोष वसंतराव भेगडे पाटील, भास्कर भेगडे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार सुनील शेळके म्हणाले, या शहराचा इतिहास व सुसंस्कृतपणा जपून पक्षीय राजकारण बाजूला ठेवून विकासकामांसाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे.तसेच नथुभाऊंनी दिलेला वसा आणि वारसा लोकप्रतिनिधींनी जोपासला पाहिजे.माजी मंत्री बाळा भेगडे यांनी समाजाच्या विकासाची गरज ओळखून नथुभाऊंनी लोकप्रतिनिधींसमोर ठेवलेल्या आदर्शाचे जतन करणे हे सर्वांचे काम असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे स्वागत पक्षप्रतोद सत्यम खांडगे यांनी केले, तर प्रास्ताविक मुख्याधिकारी गिरीश दापकेकर यांनी केले. सूत्रसंचालन ॲड.विनय दाभाडे आणि श्रीकांत मेढी यांनी केले. नियोजनासाठी उपमुख्याधिकारी सुप्रिया शिंदे, आरोग्य विभागाचे अधिकारी रोहित भोसले, प्रदीप टेकवडे आदींनी प्रयत्न केले. नगरसेवक शिवाजीराव आगळे यांनी आभार मानले.

आयसीआयसीआय लाइफची 'गॅरंटीड इंडेक्स्ड पेन्शन' योजना दाखल

निवृत्तीनंतर मिळणार आजीवन हमी उत्पन्नासह वाढीची संधी!

- निफ्टी ५० निर्देशांकाशी जोडलेले परिवर्तनीय उत्पन्न
- जॉइंट लाइफ, प्रीमियम परतावा आणि लवचिक पेन्शन सुविधांचा समावेश

मुंबई (दै. आरंभ पर्व)

निवृत्तीनंतर आर्थिक स्थैर्य आणि नियमित उत्पन्नाची हमी मिळावी, यासाठी आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स लिमिटेडने 'आयसीआयसीआय लाइफ गॅरंटीड इंडेक्स्ड पेन्शन' ही नवीन निवृत्ती उत्पन्न योजना सादर केली आहे. या योजनेत आजीवन हमी उत्पन्नासोबतच निफ्टी ५० टोटल रिटर्न इंडेक्सशी संलग्न परिवर्तनीय उत्पन्नाचा पर्याय देण्यात आला आहे. त्यामुळे ग्राहकांना नियमित उत्पन्नाची सुरक्षितता आणि बाजारातील वाढीचा संभाव्य लाभ अशा दोन्ही बाबींचा विचार करून निवृत्तीचे आर्थिक नियोजन करता येणार आहे.

या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार ६० ते १०० टक्क्यांपर्यंत हमी ॲन्युइटी घटक निवडता येणार आहे. उर्वरित उत्पन्नाचा भाग निफ्टी ५० टोटल रिटर्न इंडेक्सशी जोडलेला असेल. त्यामुळे बाजारातील कामगिरीनुसार निवृत्तीनंतरच्या उत्पन्नात वाढ होण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्राहकांना आयुष्यभर नियमित आणि निश्चित उत्पन्न मिळण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्याचबरोबर निर्देशांकाशी जोडलेल्या परिवर्तनीय उत्पन्नामुळे दीर्घकालीन आर्थिक गरजा आणि वाढत्या खर्चाचा विचार करून नियोजन करता येईल. ग्राहकांना त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांनुसार हमी उत्पन्न आणि बाजाराशी संबंधित उत्पन्न यांचे प्रमाण ठरवता येणार आहे. निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षितता अधिक व्यापक करण्यासाठी या योजनेत सिंगल लाइफ आणि जॉइंट लाइफ असे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच खरेदी किमतीच्या परताव्याची सुविधाही देण्यात आली आहे. वार्षिकीधारकाचा किंवा जॉइंट लाइफ पर्यायातील शेवटच्या हयात वार्षिकीधारकाचा मृत्यू झाल्यास, योजनेच्या लागू अटींनुसार भरलेल्या एकूण प्रीमियमच्या समतुल्य मृत्यू लाभ नामनिर्देशित व्यक्तीला दिला जाणार आहे.

या योजनेतील आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'ॲन्युइटी ॲडव्हान्स'. या सुविधेद्वारे ग्राहकांना पुढील पाच वर्षांपर्यंतच्या हमी वार्षिकीच्या ९९ टक्क्यांपर्यंतची रक्कम एकरकमी आगाऊ मिळवण्याचा पर्याय उपलब्ध होतो. त्यामुळे अचानक उद्भवणाऱ्या आर्थिक गरजांसाठी रोख रक्कम उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते.

याशिवाय ग्राहकांना त्यांच्या सोयीनुसार मासिक, त्रैमासिक, सहामाही किंवा वार्षिक पद्धतीने वार्षिकी मिळवण्याचा पर्याय निवडता येणार आहे. निवृत्ती नियोजन केवळ आर्थिक सुरक्षिततेपुरते मर्यादित नसून आरोग्य आणि जीवनशैलीच्या गरजांचाही त्यात समावेश असणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन कंपनीने या उत्पादनासोबत आरोग्य व्यवस्थापन आणि वेलनेसशी संबंधित मूल्यवर्धित सेवाही उपलब्ध करून दिल्या आहेत.

'आर्थिक आत्मविश्वासासह निवृत्तीचे नियोजन शक्य'

योजनेच्या शुभारंभाबाबत बोलताना आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्सचे मुख्य उत्पादन अधिकारी विकास गुप्ता म्हणाले, "वाढत्या आयुर्मानामुळे व्यक्तींना निवृत्तीनंतरच्या दीर्घ कालावधीसाठी आर्थिक नियोजन करणे आवश्यक झाले आहे. राहणीमानाचा वाढता खर्च आणि बदलत्या आर्थिक गरजा लक्षात घेता स्थिर उत्पन्नासोबतच बाजाराशी संबंधित उत्पन्नवाढीची क्षमता असणाऱ्या योजनांची गरज वाढत आहे.

आयसीआयसीआय लाइफ गॅरंटीड इंडेक्स्ड पेन्शनच्या माध्यमातून ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार हमी उत्पन्नाची पातळी निवडता येईल. त्याचबरोबर बाजाराच्या कामगिरीत सहभागी होण्याची संधीही मिळेल. या लवचिक सुविधांमुळे ग्राहकांना अधिक माहितीपूर्ण निर्णय घेऊन आर्थिक आत्मविश्वासासह निवृत्तीनंतरच्या आयुष्याचे नियोजन करता येईल."

निवृत्ती नियोजनासाठी अधिक पर्याय

या नवीन योजनेच्या माध्यमातून आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्सने आपल्या निवृत्तीविषयक आर्थिक उत्पादनांच्या पोर्टफोलिओमध्ये आणखी एक पर्याय उपलब्ध करून दिला आहे. आजीवन हमी

थोडक्यात पण महत्वाचे



दिया मिर्झा प्रकरणावरून मुंबई हायकोर्टाने भाजप नेत्यांना फटकारलं

मुंबई (आरंभ पर्व) : अभिनेत्री दिया मिर्झाचा सार्वजनिक रस्त्यांवर फटाके न फोडण्याचं आवाहन करणारा जनजागृती व्हिडीओ हटवल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने भाजप नेत्यांना चांगलेच फटकारलंय. राजकीय नेत्यांनी केलेल्या अनाठायी टिप्पण्यांमुळे आम्ही व्यथित आहोत, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलंय. तसेच भारत हा धर्मनिरपेक्ष देश असल्याची आठवण करून देत न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला हटवलेला व्हिडीओ पुन्हा सोशल मीडियावर प्रसारित करण्याचे आदेश दिलेत. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने भाजप नेत्यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. काही राजकीय नेत्यांनी केलेल्या टिप्पण्या अनाठायी आणि अयोग्य असल्याचं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं. भारत हा धर्मनिरपेक्ष देश असून, अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे आम्ही व्यथित झालो आहोत, असंही न्यायालयाने म्हटलंय. यासोबतच दिया मिर्झाचा हटवण्यात आलेला जनजागृती व्हिडीओ पुन्हा सोशल मीडियावर प्रसारित करण्याचे आदेश मुंबई महानगरपालिकेला दिलेत. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने भाजप नेत्यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. काही राजकीय नेत्यांनी केलेल्या टिप्पण्या योग्य नसल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

स्पा सेंटरच्या नावाखाली भलतेच धंदे, पोलिसांनी धाड टाकताच प्रकार उघड

मुंबई (आरंभ पर्व) : मुंबईतील पवई परिसरातील एका स्पा सेंटरवर पोलिसांनी छापा टाकून सेक्स रॅकेटचा पर्दाफाश केला. या प्रकरणात स्पाची व्यवस्थापक भारती हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी एका 18 वर्षीय तरुणीची सुटका केली आहे. संबंधित तरुणीला महिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे. पोलिसांना काही दिवसांपूर्वी पवईतील हिरानंदानी गार्डन परिसरात असलेल्या पवई प्लाझामधील एका स्पामध्ये बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी एक बोगस ग्राहक पाठवून गुप्त तपास सुरू केला. ठरलेल्या प्लॅननुसार बोगस ग्राहक स्पामध्ये गेला. तेथे त्याची भेट स्पाची व्यवस्थापक भारती हिच्याशी झाली. ग्राहकाने मसाजच्या सेवांबाबत विचारणा केली असता तिने मसाजसाठी दोन हजार रुपये आणि शारीरिक संबंधांसाठी तीन हजार रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. यानंतर व्यवस्थापकाने एका तरुणीला ग्राहकासोबत स्पामधील खोलीत पाठवले. ठरल्याप्रमाणे बोगस ग्राहकाने पोलिसांना इशारा दिल्यानंतर पवई पोलिसांनी तात्काळ स्पावर छापा टाकला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी तरुणीची सुटका केली आणि स्पामध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर व्यवहाराबाबत पुरावे गोळा केले. या प्रकरणानंतर पोलिसांनी स्पाची व्यवस्थापक भारती हिच्याविरुद्ध संबंधित कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे. तसेच या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपासही सुरू करण्यात आला आहे. परिसरात अशा प्रकारचे बेकायदेशीर व्यवसाय सुरू असल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे. या कारवाईमुळे पवई परिसरातील बेकायदेशीर प्रकारांवर पोलिसांनी लक्ष ठेवले असल्याचे स्पष्ट झाले असून, अशा घटनांना आळा घालण्यासाठी तपास अधिक वेगाने सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

“फर्स्ट AC मध्येही सुरक्षित नाही” महिलेचे लाखोंचे दागिने गायब

मुंबई (आरंभ पर्व) : उत्तर प्रदेशची राजधानी असलेल्या लखनऊमधील चारबाग रेल्वे स्थानकावर एक संतापजनक घटना घडली आहे. आनंद विहार ते न्यू जलपाईगुड़ी एक्सप्रेसच्या फर्स्ट एसी कोचमधून प्रवास करणाऱ्या एका महिला प्रवाशाच्या बॅगमधून सुमारे अडीच लाख रुपयांचे दागिने आणि २५ हजार रुपये रोख चोरीला गेल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे रेल्वेच्या प्रीमियम डब्यांमधील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जेव्हा महिला प्रवाशाला आपल्या सामानाची चोरी झाल्याचे समजले, तेव्हा तिने तातडीने ट्रेन थांबवण्यासाठी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी तब्बल चार वेळा इमर्जन्सी चेन ओढली. परंतु, महिलेचा दावा आहे की चेन ओढूनही ट्रेनमधील कोणताही टीटीई TTE किंवा आरपीएफ RPF जवान मदतीसाठी पोहोचला नाही. तसेच रेल्वेच्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तरी तिथूनही तत्काळ कोणतीही मदत मिळाली नाही. या संपूर्ण घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत असून, यामध्ये महिला अत्यंत हताश होऊन तीच्यासोबत घडलेली घटना सांगताना दिसत आहे. फर्स्ट एसीसारख्या प्रीमियम आणि सुरक्षित मानल्या जाणाऱ्या कोचमध्ये जर महिला सुरक्षित नसतील, तर सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षेचे काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या प्रकरणावरून समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत भाजप सरकारवर कडाडून टीका केली आहे. 'भाजप राजमध्ये गुन्हेगार मोकाट फिरत आहेत आणि महिलांची सुरक्षा वाऱ्यावर सोडली गेली आहे,' असे म्हणत त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

एक हजार किशोरवयीन मुलींना आरोग्याचे धडे!

डिसेंट फाउंडेशनच्या पुढाकारातून आरोग्य, स्वच्छता आणि स्वसंरक्षणाबाबत जनजागृती

जुन्नर शहर (दै. आरंभ पर्व)

किशोरवयीन मुलींचे आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने डिसेंट फाउंडेशन, पुणे आणि दिल्ली येथील 'बाला' (Bala) संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर तालुक्यात ‘कळी उमलताना’ हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत जुन्नर तालुका व परिसरातील विविध शाळांमधील तब्बल एक हजार किशोरवयीन मुलींना मोफत पर्यावरणपूरक सॅनिटरी पॅड्स आणि ‘कळी उमलताना’ या मार्गदर्शक पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमांतर्गत आयोजित मार्गदर्शन शिबिरांमध्ये मुलींना शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची काळजी आणि स्वसंरक्षण अशा विविध विषयांवर तज्ज्ञ महिला डॉक्टरांनी सविस्तर मार्गदर्शन केले. ग्रामीण भागात आजही मासिक पाळीविषयी अनेक समज-गैरसमज असून या विषयावर मोकळेपणाने चर्चा केली जात नाही. विशेषतः आई आणि मुलीमध्ये या विषयावर संवादाचा अभाव असतो. हीच दरी कमी करण्यासाठी डिसेंट फाउंडेशन महिला डॉक्टरांच्या माध्यमातून मुलींशी संवाद साधत त्यांना योग्य माहिती देण्याचे काम करीत आहे.

शिबिरादरम्यान मुलींनीही आपल्या मनातील विविध शंका आणि प्रश्न उपस्थित केले. तज्ज्ञांनी त्यांचे समाधानकारक निरसन केले. तसेच चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श, एड्सविषयक जनजागृती आणि स्वतःच्या सुरक्षिततेबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून ‘कळी उमलताना’ हा उपक्रम गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे. पुणे, नगर, ठाणे आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील ५० हजारांहून अधिक किशोरवयीन मुलींपर्यंत हा उपक्रम पोहोचविण्यात आला आहे, अशी माहिती फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी दिली. ऑक्टोबर २०२६ मध्ये जुन्नर तालुक्यातील ब्रह्मनाथ विद्यालय, पारुंडे; श्री संस्था ज्ञानेश्वर विद्यालय, सावरगाव; सावित्रीबाई फुले व सीताबाई तांबे ज्युनिअर कॉलेज, ओतूर; शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, मुथाळणे तसेच मुरबाड तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, मढ येथे हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

> ‘सशक्त, निरोगी आणि स्वावलंबी मुलगी म्हणजेच उज्ज्वल समाजाचे भविष्य’ हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डिसेंट फाउंडेशनच्या सर्व सदस्यांसह संबंधित शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

> या उपक्रमात डॉ. एफ. बी. आतार, डॉ. कल्याणी पुंडे, डॉ. पुष्पलता शिंदे, डॉ. अदिती वलबणकर, उज्वला गवळी, छाया पाटील आणि शितल पवार यांनी मार्गदर्शक म्हणून सहभाग घेतला. त्यांनी विविध सत्रांच्या माध्यमातून मुलींशी संवाद साधत आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण माहिती दिली.

नोव्हेंबरमध्ये करदात्यांना मोठा झटका! या ५ तारखा चुकवल्या तर भरावा लागेल दंड

पुणे (दै. आरंभ पर्व)

नोव्हेंबर महिना सुरू होताच करदात्यांच्या कामांची लगबग वाढणार आहे. कारण या महिन्यात आयकराशी संबंधित अनेक महत्त्वाच्या अंतिम मुदत समोर आल्या आहेत. नोकरदारांपासून ते व्यावसायिक आणि मोठ्या कंपन्यांपर्यंत अनेकांना या तारखांचा थेट संबंध येणार आहे. कुठे TDS जमा करायचा आहे, कुठे TCS चे प्रमाणपत्र द्यायचं आहे, तर कुठे आयकर रिटर्न भरण्याची अंतिम संधी आहे. त्यामुळे नोव्हेंबरमधल्या या तारखा लक्षात ठेवणं गरजेचं आहे. महिन्याची सुरूवातच ७ नोव्हेंबरच्या महत्त्वाच्या मुदतीने होईल. या दिवशी कंपन्या आणि TDS-TCS कपात किंवा संकलन करणाऱ्या संस्थांना ऑक्टोबर महिन्यातली संबंधित रक्कम सरकारकडे जमा करावी लागेल. तसेच पात्र व्यवहारांसाठी Form 127 सादर करण्याचीही अंतिम मुदत आहे. त्यामुळे कंपन्यांच्या अकाउंट विभागासाठी ही तारीख महत्त्वाची ठरणार आहे. त्यानंतर १४ नोव्हेंबरला Form १३२ सादर करण्याची मुदत संपेल. मालमत्तेची खरेदी-विक्री, घरभाडे किंवा डिजिटल मालमत्तेशी संबंधित काही व्यवहारांमध्ये TDS कापलेला असेल तर त्याचे प्रमाणपत्र देणं आवश्यक असेल.



इंग्रजी भाषेतील भारतातील पहिला ‘मी’ दिवाळी अंकाचे प्रकाशन

दिनकर शिलेदार यांचा नाविन्यपूर्ण प्रयोग; दिनमार्क पब्लिकेशनच्या २७ वा ‘छंद’ दिवाळी अंकही प्रकाशित

पुणे (दै. आरंभ पर्व)

मराठी भाषेत दिवाळी अंकांना मोठी परंपरा आहे. मराठीसोबतच आता इंग्रजी भाषेतील दिवाळी अंकाचाही आस्वाद वाचकांना घेता येणार आहे. पुण्यातील ज्येष्ठ संपादक दिनकर शिलेदार यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेतून दिनमार्क पब्लिकेशनतर्फे इंग्रजी भाषेतील भारतातील पहिलावहिला दिवाळी अंक आज सोमवारी (२ नोव्हेंबर) प्रकाशित करण्यात आला. विशेष म्हणजे पत्रकारांच्या हस्ते या ‘मी’ दिवाळी अंकाचे, तसेच मराठीतील लोकप्रिय व संग्राह्य ‘छंद’ या दिवाळी अंकाचेही पत्रकार संघात प्रकाशन करण्यात आले. प्रसंगी दिनकर शिलेदार यांच्याबरोबर लेखक अजय कुलकर्णी व सजावटकार रामदास वाकचौरे उपस्थित होते. ‘मी’ या इंग्रजी दिवाळी विशेषांकाची संकल्पना मांडताना दिनकर शिलेदार म्हणाले, "जगभरातील व्यावसायिक ब्रँडची ओळख, त्यांची यशोगाथा मांडणारा हा अंक आहे. ब्रँड म्हणजे केवळ नाव, लोगो, उत्पादन किंवा बाजारपेठेतील स्थान नव्हे, तर दीर्घकाळ जपलेला विश्वास, गुणवत्ता, मूल्ये आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी, हा विचार या अंकातून मांडण्यात आला आहे. उद्योजक, व्यावसायिक, संशोधक, नवकल्पना आणि नेतृत्व क्षेत्रात कार्यरत व्यक्तींचा प्रवास, त्यांचे अनुभव, संघर्ष आणि यशामागील भूमिका यांचा वेध या विशेषांकात घेण्यात आला आहे. ब्रँडनिर्मितीचा विचार केवळ विपणनापुरता मर्यादित न ठेवता साहित्यिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही त्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या अंकात करण्यात आला आहे.



याबरोबरच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर मराठी साहित्याची समृद्ध परंपरा आणि साहित्यिक संस्थांचे समाजातील योगदान यांचाही संदर्भ या अंकात महत्त्वाचा ठरतो." ‘छंद’ दिवाळी अंकात यंदा निसर्ग आणि मानवी जीवन यांच्यातील अतूट नात्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

निसर्गसंवर्धन, पर्यावरणाचा समतोल, जैवविविधता, जलसंपदा, जंगल आणि मानवी जीवनशैली यांसारख्या विषयांचा विविध लेखांमधून वेध घेण्यात आला आहे. निसर्ग हा केवळ मानवी गरजा भागविण्याचे साधन नसून जीवनाचा अविभाज्य भाग आहे, हा विचार या अंकातून मांडण्यात आला आहे.

समाजमंदिर सभागृहाचे शेखरजी निकम यांच्या शुभहस्ते उद्घाटन

चिपळूण-विलास गुरव (दै. आरंभ पर्व)

भोईवाडी येथील समाजमंदिर सभागृहाचे उद्घाटन आमदार शेखरजी निकम यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या उद्घाटन सोहळ्यानिमित्त भोई समाजाच्या वतीने आमदार शेखरजी निकम यांची लेझीम, बेंजो तसेच विविध पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले. संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार शेखरजी निकम यांनी भोई समाजाने समाजमंदिराच्या माध्यमातून एकत्र येऊन सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच समाजातील विविध विधायक कार्यांना चालना द्यावी, असे आवाहन केले. भोई समाजाच्या विकासासाठी आणि समाजाच्या एकजुटीसाठी आपण केलेले योगदान उल्लेखनीय असून, समाजाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर भर देताना आमदार निकम म्हणाले की, समाजातील मुलांनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षण हेच प्रगतीचे खरे साधन आहे. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. कोणताही विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी पालकांनीही जागरूक राहून मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे. समाजातील नव्या पिढीने शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध करावी, असे आवाहन त्यांनी केले. समाजमंदिर सभागृहाच्या उभारणीसाठी समाजबांधवांनी घेतलेल्या पुढाकाराचे आणि एकत्रित प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले. तसेच या कामातील उर्वरित विकासकामेही येत्या काळात पूर्ण करण्यासाठी आपण आवश्यक ते सहकार्य करू, अशी ग्वाही आमदार शेखरजी निकम यांनी आपल्या मनोगतातून दिली. यावेळी मीनल काणेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नितीन उर्फ आबू ठसाळे तसेच पांडुशेठ माळी यांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्यांनी समाजमंदिराच्या उभारणीमागील भूमिका, समाजबांधवांचे योगदान आणि या वास्तूमुळे समाजातील विविध कार्यक्रमांना मिळणारी हक्काची जागा याविषयी भावना व्यक्त केल्या.



अचानक जमीन हादरली, भूकंपाच्या धक्क्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

मुंबई (दै. आरंभ पर्व)

जम्मू - काश्मीरमधील किश्तवाड परिसरात सोमवारी रात्री भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. रात्री उशिरा अचानक जमीन हादरल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, भूकंपाची तीव्रता कमी असल्याने कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजी (NCS) या संस्थेने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर याबाबत माहिती दिली. संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, २ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजून ५६ मिनिटांनी किश्तवाड परिसरात भूकंप झाला. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.१ इतकी नोंदवण्यात आली. जमिनीपासून सुमारे ५ किलोमीटर खोलीवर या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. भूकंपाची तीव्रता कमी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात हादरे जाणवले नाहीत. तसेच या घटनेमुळे घरे, इमारतीचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. प्रशासनाकडूनही सध्या कोणत्याही मोठ्या नुकसानीची माहिती देण्यात आलेली नाही. भूकंप किती शक्तिशाली आहे, हे रिश्टर स्केलने मोजले जाते. या स्केलवर भूकंपाची तीव्रता जितकी जास्त असते, तितकी त्याची ताकद अधिक असते. २ किंवा त्यापेक्षा कमी तीव्रतेचे भूकंप सूक्ष्म स्वरूपाचे मानले जातात. असे भूकंप अनेकदा लोकांना जाणवतही नाहीत.

बारामती तालुक्यात पावसाची तुफान बॅटिंग

१५८ मिमी पाऊस तर शाळांना सुट्टी

बारामती (दै. आरंभ पर्व)

राज्याच्या अनेक भागात सध्या दुष्काळाचे गंभीर सावट असताना पुणे जिल्ह्यात मात्र अचानक वरुणराजाने दमदार हजेरी लावली आहे. संपूर्ण राज्याला पावसाची प्रतीक्षा असताना काल रात्रीपासून पुणे, बारामती आणि इंदापूर परिसराला अवकाळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. विशेषतः बारामती शहरामध्ये केवळ अडीच ते तीन तासांत तब्बल १५८ मिलिमीटर इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. एकाच रात्रीत जवळपास महिनाभराचा पाऊस कोसळल्यामुळे शहराचे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले. या ढगफुटीसदृश परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बारामती नगरपालिका प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व शाळांना तातडीने सुट्टी जाहीर केली , ज्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या बळीराजासाठी हा पाऊस मोठा सुखावह ठरला असला तरी, शहरी भागातील सर्वसामान्यांची मात्र मोठी दाणादाण उडाली आहे. आज, २ नोव्हेंबर रोजी पहाटेपासून सुरू झालेल्या या पावसाच्या रौद्र रूपामुळे बारामती शहरातील बहुतांश प्रमुख रस्ते पूर्णपणे जलमय झाले होते. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर साचलेल्या पाण्यामुळे त्यांना जणू नद्यांचेच स्वरूप प्राप्त झाले होते. विशेषतः वर्दळीच्या भिगवण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली. अचानक उद्भवलेल्या या पूरस्थितीमुळे सकाळी कामाला जाणाऱ्या नागरिकांची आणि वाहनचालकांची मोठी तारांबळ उडाली. बारामती नगरीचे नगराध्यक्ष सचिन सातव, मुख्याधिकारी पंकज भुसे,हे स्वतः पावसाची परवा न करता रस्त्यावर उतरून रोडवरील असलेल्या मोठ्या प्रमाणात पाणी काढून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला यामध्ये नगरपालिका, पीडब्ल्यूडी, महावितरण, पोलीस प्रशासन, सामान्य नागरिक, सहभागी झाले होते

अचानक आलेल्या या पावसामुळे नोकरदार वर्ग आणि घराबाहेर पडलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय झाली. तसेच, महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या भिगवण रोड, इंदापूर रोड, बस स्टॅन्ड,कसबा परिसरातही अनेक ठिकाणी पाणी साचल्याने वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. पाण्याने भरलेल्या रस्त्यांवरून वाहने चालवताना चालकांना मोठी कसरत करावी लागत होती वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

पाऊस पडल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण पसरले आहे. एकूणच विचार करता, या अवकाळी पावसामुळे पुणे आणि बारामती सारख्या शहरी भागात वाहतूक कोंडी आणि गैरसोयीचे चित्र निर्माण झाले असले तरी, दुष्काळाच्या आणि पाणीटंचाईच्या छायेत असलेल्या ग्रामीण भागासाठी मात्र हा संजीवनीच ठरला आहे.

राज्यात एकीकडे भीषण दुष्काळाचे सावट असताना हा अवकाळी पाऊस ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी नक्कीच आशेचा किरण ठरला आहे. मात्र, अवघ्या काही तासांच्या पावसाने शहरांमधील रस्त्यांवर पाणी साचण्याची गंभीर समस्या पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. यामुळे नागरी सुविधा आणि प्रशासनाच्या पावसाळी नियोजनावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाने केवळ आपत्कालीन उपाययोजनांवर अवलंबून न राहता पायाभूत सुविधांचा दर्जा कायमस्वरूपी सुधारण्याकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.



> “बारामतीत अवघ्या चार-पाच तासांत १५८ मिमी पावसाची नोंद झाली. मध्यरात्रीपासूनच पाऊस सुरू झाल्याने प्रशासन सतर्क होते. पहाटे पाच वाजल्यापासून सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), महावितरण, बारामती नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाच्या पथकांनी रस्त्यावर उतरून पावसाचे साचलेले पाणी काढण्याचे काम हाती घेतले. त्यामुळे वाहतूक सुरळीत करण्यात आली. काही ठिकाणी पाणी साचल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण झाले होते. या परिस्थितीची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांना देण्यात आली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागांची पथके समन्वयाने काम करत आहेत.”
>
> **- सचिन सातव, नगराध्यक्ष, बारामती नगरपरिषद**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

थोडक्यात पण महत्वाचे



दिवाळीचा आनंद ज्येष्ठांसोबत; केअरटेकर्स सोसायटीकडून मदतीचा हात!

- श्री स्वामी कृपा आशीर्वाद वृद्धाश्रमात रुग्णोपयोगी साहित्य, फराळ आणि आनंदाचा शिधा वाटप

पुणे (आरंभ पर्व) : दिवाळीचा सण केवळ आपल्या कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू आणि ज्येष्ठ नागरिकांसोबत आनंद वाटण्यातच खऱ्या सणाचे समाधान आहे, याचा प्रत्यय केअरटेकर्स सोसायटी ग्रुप कॅम्प पुणे यांच्या सामाजिक उपक्रमातून आला. केअरटेकर्स सोसायटी ग्रुपच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीनिमित्त श्री स्वामी कृपा आशीर्वाद वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठांना रुग्णोपयोगी साहित्य, दिवाळीचा फराळ आणि आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला. या उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. सणासुदीच्या काळात आपुलकीने विचारपूस करणारे आणि मदतीचा हात देणारे समाजातील घटक पुढे येत असल्याने ज्येष्ठ नागरिकांनाही आधार मिळत आहे. या उपक्रमाबद्दल श्री स्वामी कृपा आशीर्वाद वृद्ध निवासाचे संचालक विकास देडगे यांनी केअरटेकर्स सोसायटीच्या सर्व सभासदांचे आभार मानले. सामाजिक बांधिलकी जपत सणाचा आनंद इतरांसोबत वाटण्याचा केअरटेकर्स सोसायटीचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला. केअर टेकर सोसायटीचे कुमार शिंदे यांच्या माध्यमातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



२९ वर्षांची साहित्यसेवेची परंपरा; 'अपेक्षा'चा दीपावली विशेषांक प्रकाशित!

पुणे (आरंभ पर्व) : साहित्यविश्वात सातत्याने २९ वर्षांची वाटचाल करणाऱ्या 'अपेक्षा' मासिकाच्या दीपावली विशेषांकाचे प्रकाशन सिंहगड रोड येथील पत्रकार भवनात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. केवळ साहित्य प्रकाशनापुरता मर्यादित न राहता नव्या पिढीतील गुणवंतांचा गौरव आणि निमंत्रित कवींच्या काव्यरचनांनी हा सोहळा विशेष ठरला. निवृत्त मुख्य वनरक्षक तथा ह.भ.प. रंगनाथ नाईकडे यांच्या हस्ते विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. ईश्वर अगरवाल, ज्येष्ठ साहित्यिक व उद्योजिका चंद्रलेखा बेलसरे आणि सुप्रसिद्ध गायिका प्रज्ञा गौरकर उपस्थित होते. गेल्या २९ वर्षांपासून अपेक्षा दीपावली विशेषांकाच्या माध्यमातून दर्जेदार साहित्य वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे काम सातत्याने सुरू आहे. हा अंक दीपस्तंभाप्रमाणे साहित्य क्षेत्राला दिशा देत राहो, अशी अपेक्षा प्रमुख पाहुणे रंगनाथ नाईकडे यांनी व्यक्त केली. चंद्रलेखा बेलसरे यांनीही विशेषांकाच्या प्रदीर्घ साहित्यिक वाटचालीचे कौतुक केले. डॉ. ईश्वर अगरवाल यांनी अंकाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रासह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या युवा गुणवंतांना 'अपेक्षा युवा विशेष पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. ओपन वॉटर स्विमिंग ट्रिपल क्राऊन पुरस्कार विजेत्या गीता महेश मालुसरे, आयएएसओ सिल्व्हर मेडल विजेता बॅडमिंटनपटू शिवराज पाचपुते आणि आदित्य राजेंद्र मराठे यांचा यावेळी गौरव करण्यात आला. विशेषांक प्रकाशनानिमित्त आयोजित निमंत्रित कवी संमेलनाने कार्यक्रमात साहित्यिक रंगत आणली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक दत्तात्रय उभे यांनी केले. सूत्रसंचालन मनीष गोखले यांनी केले, तर सहसंपादक डॉ. संजय जगताप यांनी आभार मानले. विशेषांकाच्या निर्मितीत संपादक दत्तात्रय उभे, सहसंपादक डॉ. संजय जगताप, उपसंपादिका सुनीता उभे, कार्यकारी संपादक कुणाल उभे, व्यवस्थापक श्रद्धा शिंदे, श्रद्धा उभे, राजेंद्र सगर, अस्मिता मराठे आणि अपेक्षा परिवारातील सदस्यांचे योगदान लाभले.

एफडीएची मिठाई विक्री केंद्रावर कारवाई

पुणे (आरंभ पर्व) : दिवाळी सणाच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या अन्न व्यावसायिकांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. 'Safe Food, Safe Maharashtra' या मोहिमेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील धानोर येथील एका मिठाई विक्री केंद्रावर छापा टाकून तब्बल ३०३ किलो बर्फीचा साठा जप्त करण्यात आला. या बर्फीची अंदाजे किंमत १ लाख २१ हजार २०० रुपये असून, हा संपूर्ण साठा जागेवरच नष्ट करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने २ नोव्हेंबर २०२६ रोजी खेड तालुक्यातील धानोर येथील मे. आर. बिकानेर मिठाई या दुकानाची तपासणी केली.

चार पिढ्यांचा वारसा... हजारो कुटुंबांचा विश्वास... गुणवत्तेची परंपरा... आणि प्रत्येक ग्राहकासाठी आपुलकीचा जिव्हाळा!

वस्त्रविश्वाचा विश्वासाचा महाब्रँड 'शहा ब्रदर्स'

- चार पिढ्यांचा विश्वास, हजारो कुटुंबांचे जिव्हाळ्याचे नाते!
- स्व. गोकुळ शेठ शहा यांनी रुजविलेली विश्वासाची परंपरा मुकुंद शेठ आणि भरत शेठ यांनी जपली
- युवा उद्योजक आगंद शेठ शहा आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत चौथ्या पिढीचा वारसा समर्थपणे पुढे नेत आहेत!

खरेदीच्या निमित्ताने सुरू झालेले नाते आज कौटुंबिक जिव्हाळ्यात रूपांतरित झाले आहे. म्हणूनच शहा ब्रदर्स ही केवळ कापडाची बाजारपेठ नाही, तर अनेक कुटुंबांच्या विश्वासाची, आठवणींची आणि पिढ्यान् पिढ्या जपलेल्या आपुलकीची ओळख, जिव्हाळ्याचे हक्काचे ठिकाण बनले आहे!

- शहा ब्रदर्स, इंदापूर



इंदापूर-अक्षय यादव (दै. आरंभ पर्व)

काही व्यवसाय केवळ वस्तूंची विक्री करत नाहीत, तर ते पिढ्यान् पिढ्या माणसांची मने जिंकत विश्वासाची नाती निर्माण करतात. काळ बदलतो, फॅशन बदलते, बाजारपेठेचे स्वरूप बदलते; मात्र ग्राहकांशी जोडलेले आपुलकीचे नाते कायम टिकवून ठेवणारी परंपरा हीच खऱ्या यशाची ओळख ठरते. इंदापूरच्या वस्त्रव्यवसायात चार पिढ्यांचा वारसा, गुणवत्तेची परंपरा आणि ग्राहकांच्या मनातील अढळ विश्वास जपत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे 'शहा ब्रदर्स'! इंदापूरच्या मुख्य बाजारपेठेतील शहा ब्रदर्सने इंदापूरपुरते मर्यादित न राहता बारामती, दौंड, माळशिरस, माढा, करमाळा, टेंभुर्णी, मोहोळ, कर्जत, जामखेड यांसह अनेक भागांतील ग्राहकांशी आपुलकीचे ऋणानुबंध जोडले आहेत. अनेक कुटुंबांसाठी हे केवळ कापड खरेदीचे दुकान नसून पिढ्यान् पिढ्या जपलेले खरेदीचे हक्काचे ठिकाण बनले आहे. आजोबांनी जिथे खरेदी केली, आई-वडिलांनी जिथे विश्वास जपला, त्याच ठिकाणी आजची तरुण पिढीही आवर्जून खरेदीसाठी येते, हीच शहा ब्रदर्सच्या यशाची खरी पावती आहे.

कै. नारायणदास शहा, स्व. गोकुळदास शहा आणि कै. सुरेशदास शहा यांनी घातलेल्या व्यावसायिक पायावर शहा ब्रदर्सची विश्वासार्ह वाटचाल उभी राहिली. स्व. गोकुळ शेठ शहा यांनी ग्राहकांशी प्रामाणिक व्यवहार, आपुलकी आणि जिव्हाळ्याचे नाते जपण्याची परंपरा निर्माण केली. त्यानंतर मुकुंद शेठ शहा आणि भरत शेठ शहा यांनी हा वारसा समर्थपणे पुढे नेत ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ केला. शहा कुटुंबाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक ग्राहकाला केवळ ग्राहक न मानता कुटुंबातील सदस्याप्रमाणे सन्मान आणि आपुलकी देणे. त्यामुळेच अनेक दशकांपासून या व्यवसायाशी जोडलेली नाती आजही तितक्याच प्रेमाने टिकून आहेत. परंपरेची मुळे घट्ट ठेवून आधुनिकतेची कास धरण्याचे काम युवा उद्योजक आगंद शेठ शहा करीत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, बदलते फॅशनविश्व, नव्या पिढीच्या आवडीनिवडी आणि व्यावसायिक क्षेत्रातील आधुनिक पद्धती यांची सांगड घालत ते शहा ब्रदर्सचा वारसा पुढे नेत आहेत. त्यांना मुकुंद शेठ आणि भरत शेठ शहा यांचे अनुभवसंपन्न मार्गदर्शन आणि भक्कम पाठबळ लाभत आहे. जुन्या पिढीचा अनुभव आणि नव्या पिढीचा आधुनिक दृष्टिकोन यांचा संगम हीच या व्यवसायाची पुढील वाटचालीतील मोठी ताकद ठरत आहे.

सुटिंग-शर्टिंग, किड्सवेअर, रेडिमेड लेडीजवेअर, जेन्ट्स व लेडीज होजिअरी, ड्रेस मटेरियल, सिल्क व कॉटन साड्या, पैठणी, शाल, पंजाबी ड्रेस, जीन्स, टी-शर्ट आणि आधुनिक वेस्टर्न वेअर अशा कपड्यांच्या विविध प्रकारांनी शहा ब्रदर्सचे दालन सजलेले आहे. लहान मुलांपासून तरुणाईपर्यंत, महिला-पुरुषांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येकाच्या आवडीनिवडींचा विचार करून येथे विविध पर्याय उपलब्ध आहेत. लग्नसराई, सण-उत्सव आणि कौटुंबिक समारंभांच्या खरेदीसाठीही ग्राहकांना एकाच ठिकाणी विविधता मिळते. दर्जेदार कापड, आकर्षक डिझाइन्स, टिकाऊपणा आणि वाजवी दर यामुळे ग्राहकांच्या पसंतीत या दालनाने विशेष स्थान मिळवले आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात व्यवसायाची व्याप्ती वाढवण्यापेक्षा ग्राहकांच्या मनातील स्थान टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. शहा ब्रदर्सने चार पिढ्यांपासून जपलेली आपुलकीची नाळ हेच त्यांचे खरे वैशिष्ट्य आहे. इंदापूरसह माढा, करमाळा, टेंभुर्णी, दौंड, अकलूज आणि दूरवरच्या अनेक गावांमधून ग्राहक आवर्जून खरेदीसाठी येतात, यामागे वर्षानुवर्षे जपलेला विश्वास आणि समाधानाचा अनुभव आहे.

काळ बदलला, फॅशन बदलली, खरेदीच्या पद्धती बदलल्या; मात्र शहा ब्रदर्सने ग्राहकांशी जोडलेले प्रेमाचे नाते बदलू दिले नाही. स्व. गोकुळ शेठ शहा यांनी लावलेल्या विश्वासाच्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला असून, मुकुंद शेठ, भरत शेठ आणि आगंद शेठ शहा यांच्या माध्यमातून ही परंपरा नव्या उंचीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

दिवाळीनंतर पुणेकरांना पाणीटंचाईची झळ बसणार?



पुणे (दै. आरंभ पर्व)

- खडकवासला धरणाच्या पाणी नियोजनाचा मुद्दा ऐरणीवर!
- रब्बी आवर्तनाला ४० दिवस पूर्ण
- शहरातील संभाव्य पाणीकपात टाळण्यासाठी कालव्याचे पाणी वळविण्याची मागणी

पुणे महानगरपालिकेने पाणीकपातीचा निर्णय निश्चित केला असला, तरी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सध्या शहरात पाणीकपात लागू करण्यात आलेली नाही. मात्र, दिवाळीनंतर पाणीपुरवठ्यावर कपात लागू होण्याची शक्यता असल्याने पुणेकरांचे लक्ष आता खडकवासला धरणातील पाणीसाठा आणि त्याच्या नियोजनाकडे लागले आहे.

एकीकडे शहरात आगामी पाणीकपातीची शक्यता व्यक्त होत असताना दुसरीकडे खडकवासला धरणातून रब्बी हंगामासाठी कालव्याद्वारे पाण्याचे आवर्तन सुरू आहे. या आवर्तनाला ४० दिवस पूर्ण झाले आहेत. त्यामुळे शहराच्या पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता शेतीसाठी सुरू असलेल्या आवर्तनाचा फेरविचार करण्याची मागणी पुढे येत आहे.

यंदा पावसाने समाधानकारक हजेरी लावूनही पुणे शहराला पाणी नियोजनाच्या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. दिवाळीनंतर पाणीकपात लागू झाल्यास नागरिकांची गैरसोय होऊ शकते. अशा परिस्थितीत उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करताना शहराच्या पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची गरज व्यक्त होत आहे. भाजपचे खडकवासला विधानसभा मंडल अध्यक्ष विजय मते यांनी रब्बी आवर्तन तातडीने बंद करून हे पाणी पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

विजय मते म्हणाले, "खडकवासला धरणातून मागील ४० दिवसांपासून सुरू असलेले रब्बी आवर्तनाचे पाणी तात्काळ बंद करावे. बंद केलेले पाणी पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध करून द्यावे. दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेऊन शेतीसाठीच्या पाण्यावर योग्य निर्बंध लागू करावेत." दिवाळीनंतर संभाव्य पाणीकपातीचे संकट टाळण्यासाठी प्रशासन आताच पाणीवाटपाचे फेरनियोजन करणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.





राजयोग सोसायटी ते शिवाजीनगर थेट बससेवा सुरू

धायरी (दै. आरंभ पर्व)

- धायरीकरांचा प्रवास होणार सुसह्य
- आ. भीमराव तापकीर यांच्या हस्ते पीएमपीएमएल बससेवेचा प्रारंभ

सिंहगड रोड धायरी परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळ देणारी राजयोग सोसायटी ते शिवाजीनगर ही पीएमपीएमएल बससेवा सुरू झाली आहे. या सेवेमुळे शिवाजीनगरच्या दिशेने प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, नोकरदार आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. धायरी आणि परिसरातील नागरी वस्तीचा विस्तार झपाट्याने होत असताना सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधांमध्ये वाढ करण्याची गरज सातत्याने व्यक्त होत होती. विशेषतः शिवाजीनगरकडे जाण्यासाठी नागरिकांना प्रवासाचे पर्यायी मार्ग शोधावे लागत होते. या पार्श्वभूमीवर राजयोग सोसायटी ते शिवाजीनगर बससेवा सुरू झाल्याने प्रवाशांची सोय होणार आहे. आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते या बससेवेचा शुभारंभ करण्यात आला. माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेविका कोमल सारंग नवले यांनी बससेवा सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. आमदार भीमराव तापकीर म्हणाले, "राजयोग सोसायटी ते शिवाजीनगर बससेवा सुरू झाल्यामुळे परिसरातील नागरिक, विद्यार्थी आणि नोकरदार वर्गाच्या प्रवासाचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे आणि नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहोत."

यावेळी माजी नगरसेवक बाळासाहेब नवले ,नगरसेविका जयश्री भुमकर, नगरसेविका कोमल नवले , मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, मा. स्वीकृत सदस्य गंगाधर भडावळे, सारंग नवले, प्रभाग अध्यक्ष राजूदादा कुटे, माजी उपसरपंच सुशांत कुटे, सामाजिक कार्यकर्ते तुषार श्रीहरी पोकळे, यांच्यासह विविध पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

हिंजवडी-पुणे मेट्रोचे वेळापत्रक जाहीर...दर साडेपाच मिनिटांनी फेरी

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणेकरांसाठी आणि विशेषतः हिंजवडी आयटी पार्कमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. पुणे मेट्रोच्या बहुप्रतीक्षित पिंक लाईनचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. माण ते जिल्हा न्यायालय या मार्गावर ४ नोव्हेंबर २०२६ पासून प्रवासी सेवा सुरू होणार आहे. त्यामुळे हिंजवडी आणि मध्यवर्ती पुणे यांच्यातील प्रवास अधिक जलद, सोयीस्कर आणि आरामदायी होण्याची अपेक्षा आहे. पुणे मेट्रोची ही पिंक लाईन माण, हिंजवडी ते जिल्हा न्यायालय या महत्त्वाच्या मार्गाला जोडणार आहे. या मार्गाची एकूण लांबी २३.३ किलोमीटर असून, माण ते जिल्हा न्यायालय हे अंतर पार करण्यासाठी अंदाजे ४५ मिनिटे लागणार आहेत. यामुळे दररोज हिंजवडी आयटी पार्कमध्ये जाणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच वाहतूक कोंडीमुळे होणारा वेळेचा अपव्ययही कमी होण्यास मदत होऊ शकते. या मार्गावरील पहिली मेट्रो सकाळी ६ वाजता धावणार आहे. माण, जिल्हा न्यायालय आणि इतर स्थानकांवरून प्रवाशांना पहिली मेट्रो उपलब्ध होईल. तर माण येथून जिल्हा न्यायालयाच्या दिशेने जाणारी शेवटची मेट्रो रात्री १० वाजून ३० मिनिटांनी सुटणार आहे. जिल्हा न्यायालयाकडून माणच्या दिशेने शेवटची मेट्रो रात्री ११ वाजून ३० मिनिटांनी उपलब्ध असेल.

'सूर्यदत्त'च्या विद्यार्थ्यांची अविष्कार २०२७ मध्ये उल्लेखनीय कामगिरी

संतोषी चौधरी हिला तृतीय क्रमांक, आंचल त्रिपाठी हिला चतुर्थ क्रमांक; प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्याकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन

पुणे (दै. आरंभ पर्व)

१९९९ मध्ये शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात गुणवत्तापूर्ण योगदान देण्याच्या ध्येयाने स्थापन झालेल्या सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या (एसईएफ) सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सने संशोधन, नवकल्पना आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. याच परंपरेला पुढे नेत सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्चच्या विद्यार्थ्यांनी झोनल स्तरावरील 'अविष्कार २०२७' स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील एकूण १२ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. त्यापैकी संतोषी चौधरी हिने प्युअर सायन्सेस विभागात तृतीय क्रमांक, तर आंचल त्रिपाठी हिने इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी विभागात चतुर्थ क्रमांक पटकावला. संतोषी चौधरी हिने 'फ्रेश चेक - अँनाट्टो चिटोसन बायोडिग्रेडेबल फिल्म फॉर पीएच रिस्पॉन्सिव्ह फूड पॅकेजिंग' हा संशोधन प्रकल्प सादर केला. अन्नपदार्थांच्या पॅकेजिंगसाठी अँनाट्टो आणि चिटोसन यांच्या साहाय्याने जैवविघटनशील तसेच पीएचमधील बदलांना प्रतिसाद देणारी फिल्म विकसित करण्यावर या प्रकल्पात भर देण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी तिला डॉ. वैशाली परदेशी यांचे मार्गदर्शन लाभले. आंचल त्रिपाठी हिने 'स्मार्ट डोस - अ मेकॅनिकल बटण ऑपरेटेड फिक्स्ड ५ एमएल लिक्विड मेडिसिन डिस्पेंसर' हा नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केला. द्रवरूप औषधांचा अचूक ५ मिली डोस सहजपणे देता यावा, या उद्देशाने या उपकरणाची संकल्पना विकसित करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी भाग्यश्री पवार यांचे मार्गदर्शन लाभले. झोनल स्तरावरील 'अविष्कार २०२७' स्पर्धेचे आयोजन समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे येथे करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प सादर करण्याची, आपल्या कल्पना मांडण्याची आणि इतर संशोधक विद्यार्थ्यांशी ज्ञानाची देवाणघेवाण करण्याची संधी या स्पर्धेमुळे मिळाली. या यशाबद्दल सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "१९९९ पासून सूर्यदत्त संस्थेने विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता संशोधन, प्रयोगशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण विचारांना प्रोत्साहन देण्यावर भर दिला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजोपयोगी संशोधनासाठी करावा, हा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. अविष्कारसारख्या व्यासपीठावर विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश संस्थेसाठी अभिमानास्पद आहे. विद्यार्थ्यांच्या या संशोधनवृत्तीला भविष्यातही प्रोत्साहन दिले जाईल."



या यशाबद्दल संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. सुषमा चोरडिया आणि सह-उपाध्यक्षा सौ. स्नेहल नवलखा यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील संशोधन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. या संपूर्ण सहभागाचे समन्वयन मुख्य समन्वयक डॉ. सारिका झांबड यांनी केले. विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहित करण्यात आणि स्पर्धेच्या तयारीत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या वेळी डॉ. वैशाली परदेशी, भाग्यश्री पवार आणि संबंधित प्राध्यापकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.



निवडणूक असो वा नसो, जनसेवेचा उपक्रम अखंड सुरू

सात हजार कुटुंबांसोबत किरण दगडे पाटील यांनी साजरी केली दिवाळी!

कोथरूड-बावधनमध्ये ११ वर्षांची परंपरा कायम; मोफत दिवाळी किराणा साहित्याचे वाटप, अमृता फडणवीस, मुरलीधर मोहोळ यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती





पुणे (दै. आरंभ पर्व)

निवडणुकीच्या काळात सामाजिक उपक्रमांचे आयोजन करणारे अनेकजण दिसतात; मात्र निवडणूक असो वा नसो, नागरिकांशी असलेले नाते जपत सामाजिक बांधिलकीतून सातत्याने उपक्रम राबविण्याची परंपरा कोथरूड-बावधन प्रभाग क्रमांक १० मध्ये नगरसेवक किरण दगडे पाटील यांनी कायम ठेवली आहे. त्यांच्या पुढाकारातून यंदाही दिवाळीनिमित्त तब्बल सात हजार कुटुंबांना मोफत किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. गेल्या ११ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमातून अनेक कुटुंबांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला. समाजातील आर्थिकदृष्ट्या विविध स्तरांतील कुटुंबांनाही दिवाळीचा सण आनंदाने साजरा करता यावा, त्यांच्या घरातही सणाचा गोडवा पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विशेष म्हणजे, कोणतीही निवडणूक समोर नसतानाही दरवर्षी सातत्याने हा उपक्रम आयोजित केला जात असल्याने नागरिकांकडून त्याची दखल घेतली जात आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सौ. अमृता फडणवीस यांनी किरण दगडे पाटील यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, "किरण प्रत्येक वर्षी सामाजिक उपक्रमासाठीच मला बोलावतात. त्यांचे काम खूप छान आहे."

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही या उपक्रमाची दखल घेतली. ते म्हणाले, "किरण हा तळागाळातील कार्यकर्ता असून जनतेसाठी नेहमी धावत असतो. त्याचे हे काम मी सातत्याने पाहत आहे."

या वेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि आमदार भीमरावअण्णा तापकीर यांनी उपस्थित राहून उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

अभिनेत्री स्नेहलताई तरडे, बबनराव (दादा) दगडे पाटील, नगरसेवक पृथ्वीराज सुतार, नगरसेविका अल्पना वरपे, नगरसेवक दिनेश माथवड, नगरसेविका ज्योत्स्ना कुलकर्णी यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते या कार्यक्रमाला उपस्थित होते.

'सात हजार कुटुंबांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच समाधान!'

या उपक्रमाबाबत किरण दगडे पाटील म्हणाले, "सात हजार कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवता आला, यापेक्षा मोठे समाधान नाही. नागरिकांचे प्रेम आणि आशीर्वाद हीच माझ्या कामाची खरी ताकद आहे. जनसेवेचा हा प्रवास असाच सुरू राहील." सात हजार कुटुंबांपर्यंत पोहोचलेला हा उपक्रम केवळ दिवाळी किराणा साहित्याच्या वाटपापुरता मर्यादित न राहता सामाजिक सहभाग आणि नागरिकांशी असलेल्या संवादाचे माध्यम ठरला. गेल्या ११ वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही कायम राहिल्याने कोथरूड-बावधन परिसरात या उपक्रमाची चर्चा होत आहे.









थोडक्यात पण महत्वाचे

८व्या वेतन आयोगाला एक वर्ष पूर्ण!

पुणे (आरंभ पर्व) : आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला ३ नोव्हेंबर २०२६ रोजी एक वर्ष पूर्ण झालं आहे. गेल्या वर्षभरात आयोगाने अनेक कर्मचारी संघटना आणि पेन्शनधारकांच्या प्रतिनिधींसोबत बैठका घेतल्यात. या बैठकांमध्ये पगारवाढ, भत्ते आणि पेन्शनसंबंधी विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आली. त्यामुळे आता आठव्या आयोगाचा अहवाल कधी येणार आणि कर्मचाऱ्यांच्या खात्यात वाढीव पगार कधी जमा होणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे. आठव्या वेतन आयोगाला आपला अहवाल सादर करण्यासाठी १८ महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. त्यानुसार मे २०२७ पर्यंत आयोगाच्या शिफारशी सरकारकडे सादर होण्याची अपेक्षा आहे. हा अहवाल आल्यानंतर केंद्र सरकार त्याची तपासणी करणार आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांची बेसिक सॅलरी, फिटमेंट फॅक्टर, महागाई भत्ता, इतर भत्ता आणि पेन्शनमध्ये किती बदल करायचे, याचा निर्णय घेतला जाईल. मात्र, अहवाल सादर झाला म्हणजे लगेच पगारवाढ मिळेल असं नाही. सरकारकडून सर्व शिफारशींचा अभ्यास केला जाईल. त्यानंतर अंतिम निर्णय घेऊन नवीन वेतनरचनेबाबत अधिकृत अधिसूचना जारी केली जाईल. या संपूर्ण प्रोसेसला आणखी वेळ लागू शकतो. त्यामुळे २०२७ मध्ये अहवाल आला, तरी प्रत्यक्ष वेतनवाढ लागू होण्यासाठी २०२९ किंवा २०३० पर्यंत वेळ लागू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जातोय. पण याची अजून अधिकृत तारीख जाहीर झालेली नाही.

मुख्यमंत्री फडणवीसांनी राष्ट्रवादीला अर्थखातं का दिलं नाही?

पुणे (आरंभ पर्व) : राज्यातील अर्थखात्याच्या वाटपावरून महायुतीमध्ये सुरू असलेल्या चर्चेला आता नवे वळण मिळाले आहे. अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसला देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक असल्याचे संकेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. मात्र, अर्थखात्याचा निर्णय नेमका कधी घेतला जाणार, हे मुख्यमंत्र्यांवर अवलंबून असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. धाराशिव दौऱ्यावर असताना प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून अर्थखात्याची मागणी केली जात असल्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना त्यांनी अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसलाच मिळणार असल्याचे सांगितले. सरनाईक यांच्या म्हणण्यानुसार, दुष्काळाची परिस्थिती निर्माण होण्यापूर्वीच अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसला देण्याबाबत विचार सुरू होता. मात्र, सध्या राज्यात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. दुष्काळग्रस्त भागांसाठी निधी उपलब्ध करून देणे आणि त्याचे योग्य नियोजन करणे महत्त्वाचे असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थखात्याचा निर्णय काही काळासाठी पुढे ढकलला आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळालाही मुख्यमंत्र्यांनी माहिती दिल्याचे सरनाईक यांनी सांगितले. दुष्काळासाठी लागणारा निधी आणि राज्याच्या आर्थिक नियोजनाला प्राधान्य देऊनच हा निर्णय घेण्यात येत असल्याचे त्यांच्या वक्तव्यातून स्पष्ट झाले.

भाजप नेत्याची गोळ्या झाडून हत्या, शिंदे सेनेच्या नेत्यावर आरोप

सोलापूर (दै. आरंभ पर्व)

सोलापूरमधील सांगोला तालुक्यातून एक अतिशय धक्कादायक घटना समोर आली आहे. भाजप युवा मोर्चाचे माजी तालुकाध्यक्ष प्रतापसिंह करचे यांची डोक्यात गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण सांगोला तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यात तीव्र खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे राज्यात खळबळ उडाली असून सोलापूरमधील भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले. शिंदे सेनेच्या नेत्यावर हत्या घडवून आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही घटना २७ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास सांगोला तालुक्यातील तिप्पेहळ्ळी परिसरात घडली. प्रतापसिंह करचे हे स्वतःच्या चारचाकी गाडीतून प्रवास करत असताना, त्यांच्यासोबत असलेल्या संशयित आरोपी हर्षवर्धन ऐवळे आणि विक्रम घरडे यांनी बंदुकीतून गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. याप्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, या हत्येमागे मोठा राजकीय कट असल्याचा गंभीर आरोप मृत प्रतापसिंह यांच्या पत्नी अर्चना करचे यांनी केला आहे. आटपाडी येथील शिंदे सेनेचे नेते व सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तानाजी पाटील, त्यांचे बंधू शिवाजी पाटील आणि जिल्हा परिषद सदस्य रोहन पाटील यांनीच कट रचून सुपारी देऊन ही हत्या घडवून आणल्याची लेखी तक्रार करचे कुटुंबीयांनी सोलापूरच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे दिली आहे.

फराळात रंगाचा वापर; १,१९० किलो लाडू जप्त

पुणे (दै. आरंभ पर्व)



दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर मिठाईच्या गुणवत्तेबाबत अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. पुण्यातील कोंढवा परिसरातील गायत्री लाडू भांडारच्या उत्पादन केंद्रावर छापा टाकून FDA ने तब्बल 1,190 किलो लाडू आणि इतर खाद्यपदार्थ जप्त केले आहेत. या मालाची अंदाजे किंमत 1 लाख 73 हजार 950 रुपये आहे. FDA चे अधिकारी बालाजी शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान लाडू आणि बुंदीमध्ये निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक खाद्यरंगाचा वापर केल्याचे आढळले. तसेच उत्पादन केंद्रात स्वच्छतेच्या नियमांचे पालन होत नसल्याचेही निदर्शनास आले. याप्रकरणी लाडू आणि बुंदीचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. बालाजी शिंदे म्हणाले, "उत्पादन केंद्रात अतिरिक्त खाद्यरंगाचा वापर आणि अस्वच्छता आढळली आहे. एकूण 1,190 किलो खाद्यपदार्थ जप्त करण्यात आले असून, त्यांची किंमत अंदाजे 1 लाख 73 हजार 950 रुपये आहे. नमुने तपासणीसाठी पाठवले असून पुढील कारवाई सुरू आहे." दरम्यान, दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणावर लाडू आणि मिठाईची विक्री होते. या पदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या खाद्यरंगाच्या प्रमाणावर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश तुकाराम मुंढे यांनी दिले होते. खाद्यपदार्थांमध्ये वापरला जाणारा रंग निर्धारित अन्नसुरक्षा मानकांनुसारच असावा, असा इशाराही त्यांनी दिला होता. या पार्श्वभूमीवर पुण्यात FDA ने केलेली ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. सणासुदीच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ होऊ नये, यासाठी मिठाई उत्पादक आणि विक्रेत्यांनी अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करूया!

(दै. आरंभ पर्व)

दिवाळीचा सण म्हटला की,उत्साह आणि मंगलमय वातावरण,खमंग फराळ तसेच जोडीला नवनवे कपडे व फटाक्यांची आतषबाजी. म्हणून म्हणतात. ' दिवाळी सण मोठा नाही आनंदाला तोटा '



प्रकाशाचा व आनंदाचा दिवाळीचा सण उत्साहाने साजरा करण्यासाठी आतापासूनच नियोजन सुरु झाले असेल. नातेवाईक,मित्र मंडळी यांच्या भेटीगाटी, पर्यटन आदींचा यामध्ये समावेश असणारच आहे.तसेच आई-वडीलांकडे फटाक्यांसाठी हट्ट वाढला असेल.जर आपण प्रदुषण मुक्त दिवाळी साजरी करायची ठरवली तर..

दिवाळीच्या काळात वायूप्रदुषण, ध्वनीप्रदुषणात प्रामुख्याने मोठी वाढ होत असते. अगोदरच सर्व प्रकारच्या प्रदुषणाने



• शशिकांत जाधव, पुणे •

संवाद : ९६५७७५२६६५

शहरात वास्तव्य करणे जिकिरीचे झाले आहे.यात दिवाळीमध्ये अधिक भर पडत असते.आज बाजारात विविध प्रकारचे फटाके विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यातून ध्वनी व वायूप्रदुषणाचा धोका निर्माण होतो.फटाक्यांमुळे अनेक अपघातांची उदाहरणे यापूर्वी घडली आहेत.तसेच फटाक्यांवर केलेला खर्च हा वाया जाणारा असतो.अशावेळी हा खर्च इतरत्र केला तर.यंदा राज्यात कोरडा दुष्काळ पडला आहे.फटाक्यांवरील खर्च टाळून शेतकरी, अनाथाश्रम,वृद्धांश्रम येथे असणारे मुले-मुली,वृद्ध गृहस्थ यांना अन्नधान्य, नवनवीन कपडे,दिवाळीचा फराळ उपलब्ध करून दिला तर ख-या अर्थाने त्यांच्या जीवनात आनंदाचे दोन क्षण निर्माण केल्यास तीच खरी आपली दिवाळी.

फटाके मुक्त दिवाळी साजरी केल्यास वाढत्या प्रदुषणावर आळा बसेल. चला तर मग आता किल्ले बनवू या!पुस्तके वाचून वाचन संस्कृती वाढवू या!दिवाळी अंकाच्या रूपात शब्द फराळ आपल्याकडे उपलब्ध आहेच. तर वाचलेल्या पुस्तकांवर तसेच दिवाळी अंकावर चर्चा करू या!पर्यटनाचा अनुभव घेवून भौगोलिक इतिहास समजून घेवू या!नात्यांचा गुंफण वाढवू या!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार
NEWS CHANNEL



दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!

आपणही बना आमच्या टीमचा भाग !

महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

आम्हाला हवे आहेत :

पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक. पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

आमच्याशी जोडल्याने मिळेल :

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- निःपक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! समाजाचा आवाज बना!

आपली ओळख करा...
आपला आवाज बुलंद करा!

संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!

दै. आरंभ पर्वला
जाहिरात देऊन तर पहा..!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

आपल्या व्यवसायाची भरारी,
आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा दैनिक आरंभ पर्व.

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरणीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

आपल्या यशाची सुरुवात
योग्य प्रसिद्धीपासून...!

आजच जाहिरात द्या आणि
आपल्या व्यवसायाला
द्या नवी ओळख..!

दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात,
उद्याची यशोगाथा..!

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

आपल्या जाहिरातींसाठी
विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व
सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती
आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये –
विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.

आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी



आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यत पोहोचवण्यासाठी
आजच संपर्क साधा!

संपर्क :

प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल :
aparvinfo@gmail.com

दैनिक आरंभ पर्व | "आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र"